| लातूर | वर्ष ३४ वे | अंक २५६ वा | सोमवार, दिनांक ०५ जानेवारी २०२६ | पृष्ठे ६ | किंमत १ रू.

RNI 47034/64

# लातूर समाचार

LATUR SAMACHAR

Email-dainiklatursamachar@gmail.com


(सांज दैनिक)

प्रकाशन: लातूर

पोष्ट परवाना L2/RNP/OMD- 52/24-26

संस्थापक : स्व.शंकर माधव जडे (स्वातंत्र्य सैनिक)    कार्यकारी संपादक : शिवाजी दयानंद जडे

## दिल्ली दंगलप्रकरणी सर्वोच्च न्यायालयाने उमर खालिद आणि शरजील इमामला जामीन नाकारला



**नवी दिल्ली/वृत्तसंस्था : २०२० च्या दिल्ली दंगलीतील आरोपी उमर खालिद आणि शरजील इमाम यांच्या जामीन अर्जावरील निकाल राखून ठेवला होता. आज सोमवारी, न्यायमूर्ती अरविंद कुमार आणि न्यायमूर्ती प्रसन्ना बी. वराळे यांच्या खंडपीठाने जामीन नाकारला. फेब्रुवारी २०२० च्या ईशान्य दिल्ली दंगलीमागील कथित मोठ्या कटात उमर खालिद आणि शरजील इमाम हे सहभागाच्या पदानुक्रमात उच्च स्थानावर होते असे मानून, सर्वोच्च न्यायालयाने सोमवारी त्यांना जामीन नाकारला तर इतर पाच आरोपींना सशर्त जामीन मंजूर केला.**

२०२० च्या दिल्ली दंगलींशी संबंधित बेकायदा कारवाया (प्रतिबंध) कायद्याअंतर्गत गुन्हेगारी कट रचल्याचा आरोप खालिदवर आहे. या दंगलीत ५३ लोकांचा मृत्यू झाला होता तर शेकडो लोक जखमी झाले होते. खालिदला २०२० मध्ये अटक करण्यात आली होती आणि तेव्हापासून आजपर्यंत अनेक न्यायालयीन सुनावणी झाल्या आहेत.

**सर्वोच्च न्यायालयाने नेमकं काय म्हटले?**

जामिनाचा विचार करताना प्रत्येकजण समान स्थानावर नसतो. दिल्ली दंगलीतील इतर आरोपींपेक्षा उमर खालिद आणि शरजील इमाम गुणात्मकदृष्ट्या वेगवेगळ्या स्थानांवर आहेत. सहभागाच्या पदानुक्रमानसार न्यायालयाने प्रत्येक जामीन अर्जाचे वैयक्तिकरित्या मूल्यांकन करणे आवश्यक आहे. त्यामुळे जामिनीच्या बाबतीत समानता यांत्रिकरित्या लागू करता येत नाही. कलम २१ नुसार राज्याने प्री ट्रायल कोठीला दीर्घकाळ समर्थन देणं आवश्यक आहे, असं सर्वोच्च न्यायालयाने म्हटले.



या न्यायालयाचे समाधान आहे की सरकारी वकिलांनी अपीलकर्ते उमर खालिद आणि शरजील इमाम यांच्याविरुद्ध प्रथमदर्शनी आरोप उघड केला आहे. या अपीलकर्ते यांच्यासाठी कायदेशीर मर्यादा लागू आहेत. कार्यवाहीचा हा टप्पा त्यांच्या जामिनावर वाढ करण्यास समर्थन देत नाही, असेही न्यायालयाने स्पष्ट केले.

ऑक्टोबरमध्ये झालेल्या सुनावणीत खालिदची बाजू मांडणारे ज्येष्ठ वकील कपिल सिब्बल म्हणाले, दिल्लीतील दंगलीप्रकरणी ७५१ एफआयआर दाखल झाले आहेत. मात्र खालिदवर फक्त एकच एफआयआर आहे. तसंच, दंगलीच्या वेळी खालिद दिल्लीत उपस्थित नव्हता आणि त्याच्याकडून किंवा त्याच्या सांगण्यावरून बनवलेले कोणतेही शस्त्रे, ॲसिड किंवा कोणतेही गुन्हेगारी साहित्य जप्त झालेले नाही.

**मी दिल्लीतच नव्हतो**

मी दिल्लीतच नव्हतो तर मी या प्रकरणाशी कसा जोडला जाऊ शकतो?, असा प्रश्न खालिदने कपिल सिब्बल यांच्यामार्फत विचारला.

**खालिद आणि इमाम बौद्धिक शिल्पकार**

डिसेंबर २०१९ च्या सुरुवातीला नागरिकत्व सुधारणा विधेयक मंजूर झाल्यानंतर खालिद आणि इमाम यांच्याकडूनच कारवायांना सुरुवात झाली. त्यांनी मुस्लिम वस्ती असलेल्या भागात व्हॉट्सॲप ग्रुप तयार केले आणि पत्रके वाटली ज्यात निषेध आणि चक्का-जाम करण्याचे आवाहन केले गेले.

आवश्यक पुरवठा खंडित करणे समाविष्ट आहे. सरकारी वकिलांनी असा युक्तिवाद केला होता की इमाम आणि खालिद हे संपूर्ण कटामागील बौद्धिक शिल्पकार होते, त्यांनी इतर सूत्रधारांबरोबर काम केले होते.

## अमराठी मतदार गेम फिरवणार! भाजप-शिंदेसेनेला भरघोस मते मिळण्याचा अंदाज..

### नव्या सर्व्हेत कुणाची धाकधूक?

**मुंबई/प्रतिनिधी :** संपूर्ण देशाचे लक्ष लागून राहिलेला मुंबई महानगरपालिका निवडणुकीच्या प्रचाराला आता रंगत चढली आहे. सोमवारपासून मुंबईत ठाकरे बंधू आणि महायुतीच्या नेत्यांच्या प्रचारसभा सुरु होणार आहेत. मुंबईची यंदाची निवडणूक ठाकरे बंधूंसाठी अस्तित्वाची लढाई मानली जात आहे. तर भाजपने यंदा मुंबईत कोणत्याही परिस्थितीत आपलाच महापौर बसवायचा, असा चंग बांधला आहे. ठाकरे बंधूंनी) मुंबईतील मराठी मतदारांवर लक्ष केंद्रित केले आहे. तर भाजप आणि एकनाथ शिंदे यांच्या शिवसेनेने मराठी मतदारांसोबत उत्तर भारतीय व अन्य अमराठी मतदारांना आपल्याकडे खेचण्यासाठी खास रणनीती आखली आहे.

या पार्श्वभूमीवर AsceIndia या संस्थेने मुंबई महानगरपालिका निवडणुकीत कोणत्या पक्षाला कोणत्या समाजाची किती टक्के मते मिळतील, याबाबतच्या एका सर्व्हेची आकडेवारी जाहीर केली आहे. या सर्व्हेनुसार मुंबईतील जवळपास निम्मे मराठी मतदार ठाकरे बंधूंच्या पाठीशी उभे राहणार असले तरी मुंबईत भाजप आणि




शिवसेनेचीच सत्ता येईल, असा अंदाज आहे. अमराठी मतदार भाजप आणि शिंदे गटाला भरभरुन मतदान करेल, असा अंदाज या सर्व्हेत वर्तविण्यात आला आहे. मुंबईत ठाकरे बंधूंना माफक यश मिळण्याचा अंदाज सर्व्हे करणाऱ्या AsceIndia संस्थेचे संस्थापक अमिताभ तिवारी यांनी व्यक्त केला आहे. अमिताभ तिवारी यांच्या मते मुंबईतील २०१७ च्या निवडणुकीत मतदानाची टक्केवारी ५५ टक्के होती. यंदाही याच टक्केवारीच्या आसपास मतदान होईल, असे अमिताभ तिवारी यांनी म्हटले. त्यामुळे या सर्व्हेनुसार मुंबईत भाजप-शिवसेनेचा महापौर बसणार असल्याचे जवळपास निश्चित आहे. परंतु, आता उद्धव ठाकरे आणि राज ठाकरे यांच्या पक्षाला किती जागा मिळतात आणि ते मुंबईत आपले अस्तित्त्व राखणार का, हे पाहणे औत्स्युकाचे ठरेल.

## नवोदय विद्यालयात ६ वीच्या विद्यार्थीनीने संपवले जीवन; घातपाताचा संशय!

**लातूर/प्रतिनिधी :** लातूर येथील जवाहर नवोदय विद्यालयात शिकणाऱ्या सहावीतील एका अल्पवयीन विद्यार्थिनीचा मृत्यू झाल्याची धक्कादायक घटना समोर आली आहे. मृत विद्यार्थिनीचा मृतदेह मुलींच्या वसतिगृहातील खोलीत पलंगाला लटकलेल्या अवस्थेत आढळून आला. ही विद्यार्थिनी अत्यंत हुशार आणि चुणचुणीत असल्याचे सांगितले जात असून, तिने टोकाचे पाऊल उचलल्याच्या घटनेमुळे कुटुंबीयांसह शैक्षणिक वर्तुळात हळहळ व्यक्त केली जात आहे.

मृत विद्यार्थिनीचे वडील औसा तालुक्यातील टाका गावातील रहिवासी असून ते मोलमजुरी करून कुटुंबाचा उदरनिर्वाह करतात. प्राथमिक माहितीनुसार, नवोदय विद्यालयातील अभ्यासाचा ताण आणि अतिरिक्त दबावामुळेच मृत विद्यार्थिनीने आत्महत्या केली असावी, असा अंदाज व्यक्त केला जात आहे. मात्र, नातेवाईकांनी हा प्रकार आत्महत्या नसून घातपाताचा असल्याचा गंभीर आरोप केला आहे. त्यामुळे या प्रकरणाला संशयाचे स्वरूप प्राप्त झाले आहे.

घटनेची माहिती मिळताच एमआयडीसी पोलीस ठाण्याचे अधिकारी तत्काळ घटनास्थळी दाखल झाले. पंचनामा करून मृतदेह लातूरच्या शासकीय वैद्यकीय महाविद्यालयात उत्तरीय तपासणीसाठी पाठवण्यात आला आहे. आत्महत्या की घातपात, याचा उलगडा करण्यासाठी पोलीस सर्व बाजूंनी तपास करत असून वसतिगृहातील कर्मचारी, शिक्षक आणि विद्यार्थ्यांची चौकशी केली जात आहे.

दरम्यान, शासकीय वैद्यकीय महाविद्यालयात मृत विद्यार्थिनीच्या आजी-आजोबा तसेच आई-वडील यांचा आक्रोश पाहून उपस्थितांचे डोळे पाणावले. संपूर्ण परिसरात शोककळा पसरली होती.

लातूर शहरालगत असलेल्या जवाहर नवोदय विद्यालयाच्या परिसरात या घटनेनंतर मोठ्या प्रमाणावर पालक जमा झाले आहेत. काही पालकांनी विद्यालयात विद्यार्थ्यांना मारहाण होत असल्याचे आरोप करत तक्रारी केल्या आहेत. अशा वातावरणामुळे विद्यार्थी मानसिक तणावात राहत असल्याचा दावा पालकांकडून केला जात आहे. परिस्थिती नियंत्रणात ठेवण्यासाठी आणि कायदा-सुव्यवस्था अबाधित राखण्यासाठी विद्यालय परिसरात पोलीस बंदोबस्त वाढवण्यात आला आहे.या घटनेमुळे नवोदय विद्यालयातील विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेचा प्रश्न ऐरणीवर आला असून, पोलीस तपासातून नेमके सत्य काय ते लवकरच समोर येईल, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

## विकास हाच भाजपचा अजेंडा

### काँग्रेस निवडणूक वेगळ्या दिशेला घेऊन जात आहे - आ.संभाजीराव पाटील निलंगेकर

**लातूर/प्रतिनिधी :** विकासाची भूमिका घेऊन भाजपा लातूर महानगरपालिका निवडणुकीत जनतेला सामोरी जात आहे.याउलट काँग्रेसकडून जातीय विष पेरण्याचे काम केले जात आहे. काँग्रेस ही निवडणुक वेगळ्या दिशेला घेऊन जात आहे,असे प्रतिपादन माजी मंत्री आ.संभाजी पाटील निलंगेकर यांनी केले.

पाटील प्लाझा येथील भाजपा निवडणूक कार्यालयात आयोजित पत्रकार परिषदेत आ.निलंगेकर बोलत होते. शहर जिल्हाध्यक्ष अजित पाटील कव्हेकर, गुरुनाथ मगे, प्रविण सावंत यांची याप्रसंगी उपस्थिती होती.

यावेळी बोलताना आ. निलंगेकर म्हणाले की,भाजपा विकासाची भूमिका घेऊन निवडणुकीच्या रिंगणात उतरली आहे. लातूर शहरातील विविध प्रश्नांची सोडवणूक करण्याचे



काम मागील काळात भाजपाने केले आहे. यापुढेही त्यासाठी आम्ही कटिबद्ध आहोत. शहरातील वाहतुकीच्या समस्येवर उत्तर शोधणे आवश्यक आहे. त्यासाठी नियोजन करावे लागते. वाहतुकीला शिस्त लावावी लागेल. परंतु त्यासाठी लातूरमध्ये रहायला हवे, असा टोलाही आ. निलंगेकर यांनी लगावला.

केंद्र आणि राज्यात भाजपाची सत्ता आहे. लातूरमध्ये भाजपा सत्तेत आली तर विकासासाठी ट्रिपल इंजिन मिळेल.याचा फायदा लातूरकरांना होणार असल्याचेही आ.निलंगेकर म्हणाले.

काँग्रेसला विरोधी पक्षाची भूमिका नीट मांडता येत नाही. सत्ताधारी म्हणून काम करता येत नाही. मागील १५ वर्ष जनतेने तुमचे म्हणणे ऐकले. साहेबांचा वारसा तुम्हाला दिला परंतु साहेबांना अभिप्रेत काम आपण केले का? असा सवालही आ.निलंगेकर यांनी अमित देशमुख यांचे नाव न घेता उपस्थित केला.

भाजपात जात-पात पाहून तिकिटांचे वाटप केले जात नाही. जो कार्यकर्ता जनतेची कामे करतो त्याला उमेदवारी मिळते. अशांनाच यावेळीही उमेदवारी मिळाली आहे. लातूर हे सुसंस्कृत शहर आहे.परंतु या शहरात सोशल मीडियाच्या माध्यमातून जातीय विष पेरण्याचे काम काँग्रेसकडून केले जात आहे. अशा पद्धतीने वातावरण बिघडविणाऱ्यांवर गुन्हे दाखल करण्याचा इशाराही आ. निलंगेकर यांनी दिला.

राष्ट्रहित डोळ्यासमोर ठेवून भाजपा काम करतो.इतरांच्या चारित्र्यावर चिखलफेक करणे ही आमची संस्कृती नाही.ही निवडणूक लातूरची आहे त्यामुळे लातूरकरांच्या प्रश्नावरच बोलावे. निलंगेकर -

देशमुख अशी लढाई ही बाभळगाव पासून निलंग्यापर्यंत चालेल पण लातूरमध्ये चालणार नाही,असेही आ.निलंगेकर म्हणाले. अजित पाटील यांनी केंद्र व राज्य सरकारच्या सहकार्यातुन लातूर शहरात राबविण्यात आलेल्या विविध योजनांची माहिती दिली.

### मुख्यमंत्र्यांचा लातूर दौरा...

राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस निवडणूक प्रचारासाठी बुधवार दि. ७ जानेवारी रोजी लातूरला येत आहेत. डॉ.बाबासाहेब आंबेडकर पार्क येथे सकाळी ११ वाजता त्यांची सभा होणार आहे.आज रविवारी रात्री महसूल मंत्री चंद्रकांत बावनकुळे हे बैठका घेणार आहेत.सोमवारी सकाळी साळाई मंगल कार्यालय येथे प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण यांच्या उपस्थितीत कार्यकर्ता मेळावा होणार असल्याची माहितीही आ. निलंगेकर यांनी दिली.

### कुजबुज

-डॉ. संजय जमदाडे



**२०३६ मध्ये ऑलम्पिक चे यजमानपद मिळवण्याकरिता भारताचे प्रयत्न - पंतप्रधान**

### चिमटा दयाचा



**ऊसाचे अधिक उत्पादनामुळे ओव्हरलोड वाहनात वाढ झाली आहे! यामुळे अपघाताच्या प्रमाणात वाढ होण्याची शक्यता आहे !!**

## भ्रष्टाचाराचे समूळ उच्चाटन करण्याची हीच वेळ-वंचितचे युवा नेते सुजात आंबेडकर

**लातूर/प्रतिनिधी :** लातुर शहर महानगरपालिका निवडणूक अनुषंगाने या निवडणुकितील राष्ट्रीय काँग्रेस पक्ष व वंचित बहुजन आघाडीचे प्रभाग २, प्रभाग ३, प्रभाग ४, प्रभाग ५ आणि प्रभाग ७ मधील उमेदवारांच्या प्रचारार्थ दि.०४ जानेवारी (रविवार) रोजी सायंकाळी लातुर शहरातील महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौक या ठिकाणी एकत्रित जाहीर प्रचार सभेचे आयोजन करण्यात आले होते ज्याला उत्स्फूर्त असा प्रतिसाद मिळाला.

दरम्यान माजी मंत्री आमदार अमित देशमुख, वंचितचे युवा नेते सुजात आंबेडकर खा. डॉ. शिवाजी काळगे आणि सर्व मान्यवरांकडून परमपूज्य डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून विनम्र अभिवादन करण्यात आले तसेच परमपूज्य डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे वंशज असणारे युवा नेते सुजात आंबेडकर यांना प्रथेनुसार समता सेनेच्या वतीने सलामी देण्यात आली.

यावेळी खासदार डॉक्टर शिवाजी काळगे, लातूर जिल्हा काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष अभय साळुंके,लातूर शहर जिल्हा काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष किरण जाधव,वंचित बहुजन आघाडीचे नेते मुफ़्ती सय्यद वसीम वंचित बहुजन




आघाडी चे मराठवाडा महासचिव संतोष सूर्यवंशी लातूर महिला जिल्हाध्यक्ष मंजुषा निंबाळकर लातूर शहराध्यक्ष सचिन गायकवाड, मोहन माने अमोल लांडगे चंद्रकांत चिकटे चांदपाषा इनामदार हमिद शेख ॲडव्होकेट आतिश चिकटे आकाश इंगळे राजाभाऊ माने खाजाबानू अन्सारी लातूर जिल्हा महासचिव रोहित सोमवंशी लातूर महिला शहराध्यक्ष सुजाता अजनीकर डॉक्टर विजय अजनीकर,सुनील बसपुरे बालाप्रसाद बिदादा डॉक्टर दिनेश नवगिरे चंद्रकांत मद्दे,मारुती पांडे सुनिता ताई चाळक संजय ओहाळ रफिक सय्यद बालाप्रसाद बिदादा सत्तार शेख गोविंद देशमुख सतीश पाटील आदिसह काँग्रेस पक्षाचे व वंचित बहुजन आघाडीचे विविध पदाधिकारी निरीक्षक प्रभाग क्रमांक दोन तीन चार सहा सात मधील काँग्रेस व वंचित बहुजन आघाडीचे नगरसेवक पदाचे सर्व उमेदवार, नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

यावेळी बोलताना युवा नेते सुजात आंबेडकर म्हणाले की, सण २०१६ -१७ पासून लातुर मनपा मध्ये आपण जो होत असलेला भ्रष्टाचार पाहतो आहे या भ्रष्टाचाराचे समूळ उच्चाटन करण्याची वेळ आणि या निवडणुकीच्या माध्यमातून आपल्याला एक संधी आलेली असून या संधीचे सोने आपण करावे.

जेव्हा निवडणूक होत नाही,ती डावलली जाते आणि सरकार आपले लोक,पैसे खाणारे भ्रष्ट प्रशासक नेमते हा संविधानाचा अपमान असून या प्रशासक व सरकारचे प्रतिनिधी याना लातुर मनापासून दूर करा आणि आपले स्वच्छ प्रतिमेचे,सर्वसामान्य माणसातील काँग्रेस व वंचित बहुजन आघाडीच्या उमेदवाराना प्रचंड मताधिक्क्याने निवडुन देऊन लातुर मनपात पाठवा असे आवाहन त्यांनी केले.

पुढे बोलताना ते म्हणाले की, वंचित बहुजन अघडीत मेहनत घेणाऱ्या कार्यकर्त्यांना आणि त्यातही युवकांना व बहुजनांचे उमेदवार देऊन त्यांना सत्तेत नेण्याचे काम व त्यांना बळ देण्याचे काम बाळासाहेब आंबेडकर व वंचित बहुजन आघाडीने केले असून यापुढेही करीत राहील असे म्हणत कार्यकर्त्यांना आश्वस्त केले. लातूरमध्ये काँग्रेस आणि वंचित बहुजन आघाडी ही आमदार अमित देशमुख आणि जेष्ठ नेत्यामुळे शक्य झाली हे त्यांनी आवर्जून त्यांनी यावेळी बोलताना सांगितले. आज येथील तरुणांच्या हाताला काम मिळत नाही,मनपा शाळांची अवस्था अत्यंत बिकट आहे यामुळे पालकांना आपली मुले इंग्रजी माध्यमाच्या शाळेत पाठवावी लागत आहेत पण ते सर्वसामान्य गोरगरीब पालकांना जमत नाही ज्यामुळे शिक्षण मिळत नाही व मिळेल ते काम करण्याची वेळ त्यांचावर येते हे चित्र आपल्याला बदलायचे असून निवडणूकित पक्ष बदलणारे,पक्षाच्या नावावर घर भरणाऱ्या भ्रष्टाना त्यांची जागा आपण दाखवावी असेही आवाहन युवा नेते सुजात आंबेडकर यांनी उपस्थित सर्वाना केले.

या जाहीर प्रचार सभेत बोलताना माजी मंत्री आमदार अमित विलासराव देशमुख म्हणाले की, लातुर शहर महानगरपालिकेची सार्वत्रिक निवडणूक जाहिर झाली असून या निवडणुक प्रचाराचा श्रीफळ आज तुमच्या साक्षीने वाढवला जात आहे. जिवाभावाची माणसे काय असतात याची प्रचिती आपल्याला पाहिल्यानंतर होते असे म्हणत परमपूज्य डॉ बाबासाहेब आंबेडकर यांनी आपल्याला जे अधिकार दिले यामुळे आपण लातूरला सुरक्षित ठेवू शकलो याची आठवण करून दिली.

वंचित बहुजन आघाडीचे युवा नेते सुजात आंबेडकर व माजी मंत्री आमदार अमित विलासराव देशमुख यांना लातूर शहर महानगरपालिका सार्वत्रिक निवडणूक साठी युथ पँथरचे संस्थापक अध्यक्ष संतोष वाघमारे व पँथर संघर्ष संघटनेचे संस्थापक अध्यक्ष धम्मदीप बलांडे यांनी जाहीर पाठिंबा दिला. या कार्यक्रमाच सूत्रसंचालन प्राध्यापक प्रवीण कांबळे यांनी केले


ओ३म् भूर्भुवः स्वः ।
तत्सवितुर्वरेण्यं भर्गो देवस्य धीमहि ।
धियो यो नः प्रचोदयात् ।।

# लातूर समाचार

## बंडखोरीमुळे डोकेदुखी वाढली

जवळपास सर्वच पक्षात बंडखोरी दिसून येत आहे. बंडखोरी यावेळी मोठ्या प्रमाणात झाली आहे. यामागील कारणे तशी असू शकतात. एकतर सतत पक्षकार्यात गुंतलेले कार्यकर्ते, ज्यांचे आयुष्य पक्षाच्या कार्यात गेले आहे. ज्यांनी प्रामाणिक पक्ष वाढविला अशांना यावेळी डावलेले आहे. त्याच प्रमाणे आर्थिक व्यवहार झाल्याचा जाहिर आरोप होताना दिसून येत आहे. राजकारणात काम करणे व उमेदवार म्हणून उमेदवारी मागणे यात मोठा फरक आहे. काही कार्यकत्याची पक्षात काम करताना आयुष्य गेले, अशांना पक्षांनी मोठे केले नाही. पुर्वी पक्षाची सर्व कामे केलेला कार्यकर्त्यास आज अयोग्य नेत्यामुळे बाजूला सारले जात आहे. निष्ठावंताची किंमत उरली नाही. पक्ष ज्या निष्ठावंतावर मोठा झालेला असतो त्याच कार्यकर्त्यांना विसरले जात आहे. काही जन नुकतेच पक्षात प्रवेश केला, अशांना मानाचे स्थान दिले जाते. वास्तविक पक्ष बदलुन स्वार्थासाठी पक्षात आलेल्यांना उमेदवारी दिली गेली आहे. यामुळे जवळपास सर्वच पक्षात नाराजीगी वाढली आहे. याचा परिणाम निवडणुक निकालावर होण्याची शक्यता आहे. भाजपा, काँग्रेस व राष्ट्रवादी पक्षात गेलेली मंडळी मुळची कोण आहे. पुर्वी काँग्रेसच एकमेव मोठा पक्ष होता. त्यातील अनेकजनांनी काँग्रेसला सोडचिट्टी देऊन भाजपात प्रवेश केला आहे. तसे पाहिले तर नगरपरिषदेच्या निवडणुकीत काँग्रेससोडून भाजपामध्ये आलेले कार्यकर्ते निवडूण आले. त्यांना काँग्रेसचे म्हणावे का भाजपाचे? पक्षाचे बॅनरपेक्षा, कार्यकर्ता कसा आहे याचा विचार आजच्या स्थितीत केला जात आहे. महानगरपालिकेच्या निवडणुकीत अनेक निष्ठावंत जुन्या कार्यकर्त्यास डावलले आहे त्याचा परिणाम पक्षाला भोगावा लागणार आहे. देशात काँग्रेसचे कार्यकर्ते मोठ्या प्रमाणात होते. उत्तरेतील भाजपात कार्यकर्ते गेले व दक्षिणेतील हे डाव्याविचारसरणीत गेले. वास्तविक जुनी मंडळी ही काँग्रेसची आहे. ठराविक मंडळी ही संघ व संघातून मुठभर भाजपात आलेले कार्यकर्ते हे कट्टरतावादी अजून ही आहेत. अशा काही कट्टरतावादी कार्यकर्त्यास उमेदवारी दिली नाही, त्यामुळे मोठा असंतोष निर्माण झाला आहे. ज्यांच्या पाठीशी मतदार आहे, अशांना डावलले तर आगामी काळात निकाल कसा लागेल हे सर्वांना माहितीच असते. आज प्रत्येक महागनरात काय स्थिती आहे. नेते मंडळी आर्थिक व्यवहारात गुंतलेली आहेत. आर्थिकव्यवहारातून जर उमेदवारी दिली असेल तर ते योग्य नाही. यातून काहीच साध्य होणार नाही. सध्याला राज्यातील काय देशातील नागरिकांना पक्का, मजबुत असा पर्याय समोर नाही. भाजपा नको तर दुसरा कोणता देशासाठी काम करणारा मजबुत पक्ष दिसून येत नाही. हिंदुत्वादी विचाराची मंडळी आहे मात्र तीही पक्के हिंदुत्वादी आलिकडील पिढीत दिसत नाही. जसे हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे कडवट हिदुत्वादी होते. त्यांनी कदापी तडजोड केली नाही मात्र त्यानंतरची पिढी ही तडजोडी बनली. मतासाठी काही ही निर्णय घेऊ लागली. अशा प्रवृत्तीवर विश्वास कोण ठेवणार? पक्षकार्यात तळमळ राहीली नाही. पक्ष नेते ही गरीब माणसे नाहीत ती श्रीमंत असणारी मंडळी आहे. तळमळ दिसून येत नाही. एकतर घराच्या भाकरी घेऊन प्रचार करणारी मंडळी लोप पावली आहे. आता हायटेक प्रचार यंत्रणा राबविली जात आहे. हॉटेलमध्ये राहाणे, खाणे सुरु आहे. पुर्वी नेता हा कार्यकर्त्याच्या घरी राहात असत. त्यांच्या घरात जे अन्न शिजले असेल तेच खात असत. आता नेता एखाद्याच्या घरी उतरला असे कदापीही पाहावयाला मिळत नाही. कार्यकर्त्याचे घर झोपडी नाही तर आलिशान बंगला आहे. अशा बंगल्यात नेते राहात नाहीत. पुर्वीची परिस्थिती आता बदलली आहे. त्यामुळे कार्यकर्त्याचे सुख-दुख कळून येत नाहीत. आजच्या स्थितीत मोदी व योगीजीमुळे हिंदुत्त्वादी पक्ष म्हणून भाजपाकडे पाहिले जाते. संघातून निर्माण झालेला पक्ष म्हणून ओळखतात. त्या पक्षाचे ध्येय-धोरण बऱ्याच कार्यकर्त्यास कळाले नाहीत कारण ज्यावेळी भाजपा सर्व बाबतीत आडचणीत होता त्यावेळी मदत करणाऱ्यास दुर केले गेले आहे. भाजपाला चांगले यश मिळाल्यानंतर पक्षात वावरणारी मंडळींना पक्ष वाढीसाठी काय मेहनत घेतली हे समजुन घेतले जात नाही. त्यामुळे आज मोठ्या प्रमाणात गैरप्रकार झाल्याने निष्ठावंतास डावलेले असे उघड बोलले जात आहे. पुर्वी भाजपावर असा आरोप झालेला नव्हता. कोठे तुरळक घटना घडल्यावर दबक्या आवाजात बोलत असत. आता उघड टिका होत आहे. गैरकारभार झाल्याचा आरोप होत आहे याची सखोल चौकशी पक्षातील जुन्या निष्ठावंताकडून होणे अपेक्षित आहे. आज ठिक आहे. सत्ता येईल किंवा जाईल जो डाग लागलेला असतो तो पुसणे आवघड होते. ज्या काँग्रेसपक्षाची सत्ता देशातील प्रत्येक राज्यात होती. उमेदवारीसाठी प्रचंड मेहनत घ्यावी लागत होती त्यापक्षाची स्थिती आज काय आहे. लोकसभेत शंभरी काढता आली नाही. ज्या सत्ताधारी भाजपाचे दोन सदस्य सुरवातीच्या काळत्त होते त्यांच्या ताब्यात पुर्ण संसद आहेत म्हणजे सर्वाधिक सदस्य भाजपाचे आहेत. हा फरक कदापी विसरून चालणार नाही. त्यामुळे आजचे सत्ताधारी उद्याचालून विरोधपक्षवाले बनू शकतात ही ताकद जनतेत आहे. जनता काधी कोणाला कोठे बसविल हे सांगता येत नाही. त्यामुळे गैरप्रकारानेउमेदवारी दिली असेल तर मोठी किंमत मोजावी लागणार आहे. सर्वस्व पैसाच काम करतो असे समजणे योग्य नाही. सध्याला राजकारणात सत्ता, संपत्तीच्या जोरावर जे चालले आहे ते अधिक काळ टिकू शकणारे नाही. त्यामुळे वेळीच नेत्यांनी सावध राहुन जमीनीवर राहीले पाहिजे. ज्यावेळी जनतेला मोठा यशस्वी पर्याय सापडेल त्यावेळी काय स्थिती होईल हे आज सांगता येत नाही. जनता आपली जबाबदारी पार पाडेल, मतदान करून बाजूला जाईल. निकालानंतर अनेकांचे डोळे उघडतील अशी स्थिती दिसून येत आहे. कार्यकर्तेच जर रस्त्यावर येऊन टिका पक्षावर करीत असतील, निष्ठावंत बैठका घेत असतील तर ते योग्य नाही. यावर विचार केला पाहिजे.पक्षात घेताना कोण निष्ठावंत आहे कोण नाही याचा विचार केला पाहिजे. स्वत:ला निष्ठावंत समजत असतील तर त्यांनी स्वबळावर अपक्ष म्हणून निवडूण आपली वेगळी ताकद दाखविणे योग्य आहे. ते न करता इतर पक्षात जाऊन लढणे हे योग्य वाटणारे नाही!

## गाडी चालवताना मोठ्या आवाजात संगीत ऐकणे किती धोकादायक? जाणून घ्या तज्ञ काय म्हणतात?



जर तुम्ही गाडी चालवताना मोठ्या आवाजात संगीत ऐकत असाल तर तुम्ही काळजी घेणे आवश्यक आहे. गाडी चालवताना मोठ्या आवाजात संगीत ऐकल्याने अनेक समस्या उद्भवू शकतात. गाडी चालवताना मोठ्या आवाजात संगीत ऐकल्याने अपघातांचा धोका लक्षणीयरीत्या वाढतो, कारण मोठ्या आवाजात संगीत ऐकल्याने चालकाचे हृदय गती वाढते, ज्यामुळे मानसिक ताण येतो. हा ताण रस्ते अपघातांच्या प्रमुख कारणांपैकी एक मानला जातो.

**सर्वेक्षण काय म्हणते?**

सर्वेक्षणानुसार, अंदाजे ८० टक्के लोकांना गाडी चालवताना मोठ्या आवाजात संगीत ऐकण्याची सवय असते, जी त्यांच्या सुरक्षिततेसाठी आणि इतर रस्त्यावरील वापरकर्त्यांच्या सुरक्षिततेसाठी खूप धोकादायक आहे.

**वैज्ञानिक संशोधन काय दर्शविते?**

वैज्ञानिक अभ्यासांनुसार, गाडी चालवताना मोठ्या आवाजात संगीत किंवा संगीत ऐकल्याने अपघातांचा धोका लक्षणीयरीत्या वाढतो. संशोधनातून असे दिसून आले आहे की जेव्हा एखादा चालक जास्त आवाजात संगीत ऐकतो तेव्हा तो त्याच्या वाहनावरील नियंत्रण गमावतो. गाडी चालवताना ते पूर्णपणे लक्ष केंद्रित करू शकत नाहीत आणि रस्ता सुरक्षा नियमांकडे दुर्लक्ष करू लागतात, ज्यामुळे चालक आणि इतर रस्ता वापरकर्त्यांच्या सुरक्षिततेला गंभीर धोका निर्माण होऊ शकतो.

वैज्ञानिक संशोधनातून असेही दिसून आले आहे की ड्रायव्हरला आवडणारे संगीत ऐकल्याने त्यांचे ड्रायव्हिंग कौशल्य सुधारू शकते आणि त्यांचे लक्ष केंद्रित होऊ शकते. तथापि, जर ड्रायव्हर असे संगीत ऐकत असेल जे त्यांना आवडत नाही किंवा त्यांना ऐकण्यास भाग पाडले जाते, तर ड्रायव्हिंग चुका अपरिहार्य आहेत. यामुळे योग्य लक्ष न मिळणे शक्य आहे, ज्यामुळे रस्ते अपघात होऊ शकतात.

**नवीन ड्रायव्हर्सना जास्त धोका**

२० ते २८ वयोगटातील नवीन ड्रायव्हर्सवर केलेल्या संशोधनात एक आश्चर्यकारक निष्कर्ष समोर आला आहे. अभ्यासानुसार, गाडी चालवताना मोठ्या आवाजात संगीत किंवा संगीत ऐकणारे नवीन ड्रायव्हर्स विचलित होण्याची शक्यता जास्त असते. या ड्रायव्हर्सनी असेही कबूल केले की मोठ्या आवाजात संगीत ऐकल्याने ते अनेकदा वेग मर्यादा ओलांडतात, म्हणजेच ते जास्त वेगाने गाडी चालवतात.

जर तुम्ही लांबचा प्रवास करत असाल आणि थकवा कमी करण्यासाठी संगीत ऐकत असाल, तर तुमच्या आवडत्या संगीताचा तुमच्या मेंदूवर परिणाम फक्त २० ते २५ मिनिटे टिकतो. त्यानंतर, तो परिणाम हळूहळू कमी होतो.

## थोडसे खाल्ले तरी पोट फुगते जडजड वाटते? 'हे' आयुर्वेदिक उपाय देतील आराम



बदलेल्या आहार पद्धतींमुळे, अनेकांना अन्न खाल्ल्यानंतर पोट फुगण्याची समस्या होत आहे. पोट फुगणे ही पोटाशी संबंधित समस्या आहे, ज्यामध्ये आम्लपित्तामुळे तुमचे पोट फुगते. पोट फुगल्याने तुम्हाला खूप अस्वस्थता येते, थोडेसे खाल्ल्यानंतरही तुमचे पोट खूप भरलेले वाटू शकते. पोट फुगण्याचे सर्वात मोठे कारण म्हणजे पोटात गॅस तयार होणे.

याशिवाय, चुकीच्या खाण्याच्या सवयी, जास्त तळलेले अन्न खाणे किंवा जेवल्यानंतर लगेच झोपण्याची सवय यामुळे पोट फुगण्याची समस्या वाढू शकते. आज आपण पोट फुगण्याच्या समस्येपासून आराम मिळविण्यासाठी काही घरगुती उपाय जाणून घेऊया.

हिंग

जेवणानंतर पोट फुगण्याची समस्या कमी करण्यासाठी तुम्ही हिंग खाऊ शकता. हिंगमध्ये कार्मिनेटिव्ह आणि अँटीस्पास्मोडिक संयुगे असतात. जे पोट फुगणे आणि आम्लता कमी करण्यासाठी फायदेशीर असतात. एक चिमूटभर हिंग ५ चमचे पाण्यात विरघळवून लगेच प्या. यामुळे अडकलेले गॅस बाहेर पडण्यास आणि तुमचे पोट स्वच्छ होण्यास मदत होईल.

लिंबू पाणी–

जेवणानंतर, पचन सुधारण्यासाठी आणि पोटफुगी कमी करण्यासाठी तुम्ही लिंबू पिऊ शकता. जेवणानंतर तुम्ही लिंबूचा रस घेऊ शकता किंवा लिंबू पाणी पिऊ शकता. यासाठी, तुम्ही एका ग्लासमध्ये लिंबू, थोडे पाणी, गुलाबी मीठ, जिरे पावडर आणि काळी मिरी मिसळून ते पिऊ शकता. हे ड्रिंक वजन वाढण्यापासून रोखण्यास देखील मदत करू शकते.

आले–

आले खाल्ल्याने पोटफुगी आणि आम्लता कमी होण्यास मदत होते. पोटफुगी कमी करण्यासाठी, जेवणापूर्वी तुम्ही आल्याचा तुकडा सैंधव मीठासह खाऊ शकता. यामुळे तुमचे चयापचय वाढण्यास आणि पचन सुधारण्यास मदत होते.

आयुर्वेदिक चहा–

या चहामध्ये तुम्ही जिरे, बडीशेप, धणे, वेलची आणि हिरडा घालू शकता. हा चहा बनवण्यासाठी, २ लिटर पाण्यात ४ चमचे जिरे, ४ चमचे बडीशेप, ४ चमचे धणे, ४ वेलची आणि एक चिमूटभर हिरडा उकळवा. पाणी अर्धे होईपर्यंत उकळवा. नंतर, जेवणाच्या ३० मिनिटे आधी आणि ३० मिनिटे नंतर एक कप हे पेय प्या. हे पेय प्यायल्याने तुमचे पचन सुधारेल आणि तुमचे चयापचय वाढेल.

## डोळे निरोगी आणि नजर तीक्ष्ण बनवण्यासाठी स्वत:ला लावा 'या' ५ सवयी



आजची बदलेली जीवनशैली, स्क्रीनसमोर तासनतास घालवणे, सतत कामाचा ताण आणि चुकीच्या खाण्याच्या सवयी यांचा डोळ्यांच्या आरोग्यावर गंभीर परिणाम होत आहे. पूर्वी वयानुसार दृष्टी कमकुवत होत होती, परंतु आता २० ते ३० वयोगटातील तरुणही चष्मा घालू लागले आहेत. डोळ्यांचा थकवा, जळजळ, अंधुक दृष्टी आणि कोरडेपणा यासारख्या समस्या सामान्य झाल्या आहेत.

डोळे हा शरीराचा सर्वात संवेदनशील भाग आहे आणि जर त्यांची योग्य काळजी घेतली नाही तर ते मोतीबिंदू, काचबिंदू आणि दृष्टी कमी होणे यासारख्या गंभीर समस्या निर्माण होऊ शकतात. पणआजच्या व्यस्त दिनचर्येमुळे लोक त्यांच्या डोळ्यांबद्दल निष्काळजी झाले आहेत. योग्य खाणे, पुरेशी झोप घेणे आणि डोळ्यांना विश्रांती देणे शक्य होत नाही. आज आपण डोळे निरोगी ठेवण्यासाठी काही सोप्या टिप्स जाणून घेऊया.

**सकाळी सूर्याकडे पाहणे–**

सकाळच्या सौम्य आणि थंड उन्हात सूर्याकडे पाहण्याची प्राचीन आयुर्वेदिक आणि निसर्गोपचार पद्धतीला सूर्यदर्शन म्हणतात. ही पद्धत डोळ्यांसाठी अत्यंत फायदेशीर मानली जाते. सूर्याच्या सुरुवातीच्या किरणांमुळे व्हिटॅमिन डी मिळते आणि ते डोळ्यांसाठी उर्जेचा स्रोत आहे. सकाळी ६ ते ८ वाजेपर्यंत ५–१० मिनिटे सूर्यप्रकाशात हळूहळू पाहिल्याने डोळ्यांचे स्नायू मजबूत होतात, दृष्टी तीक्ष्ण होते आणि डोळ्यांचा थकवा कमी होतो.

पामिंग–

पामिंग ही अतिशय फायदेशीर पद्धत आहे. यामध्ये हळुवार हातावर हात घासून डोळ्यांवर लावा. तुमचे तळवे तुमचे डोळे पूर्णपणे झाकतील याची खात्री करा, परंतु डोळ्यांवर जास्त दाब आणू नका. ही उष्णता तुमच्या डोळ्यांच्या स्नायूंना आराम देते आणि ताण कमी करते.

**थंड पाण्याने डोळे धुणे–**

डोळ्यांची स्वच्छता राखणे खूप महत्वाचे आहे. दररोज सकाळी आणि संध्याकाळी स्वच्छ, थंड पाण्याने डोळे धुण्याने डोळ्यांच्या पृष्ठभागावरील धूळ, जळजळ आणि कोरडेपणा दूर होतो. या पद्धतीमुळे डोळे थंड होतात आणि संसर्गाचा धोका कमी होतो. डोळे धुताना तुमचे हात पूर्णपणे स्वच्छ असल्याची खात्री करा आणि पाणी स्वच्छ असावे. गरम किंवा खूप थंड पाणी वापरणे टाळा, कारण यामुळे डोळ्यांना नुकसान होऊ शकते.

**डोळे उघडझाप करणे–**

जेव्हा आपण स्क्रीन किंवा पुस्तकावर जास्त लक्ष केंद्रित करतो तेव्हा आपण नकळत कमी डोळे मिचकावतो. यामुळे डोळ्यांमधील ओलावा कमी होतो, ज्यामुळे ते कोरडे आणि थकलेले राहतात. ही समस्या टाळण्यासाठी, वारंवार डोळे मिचकावणे महत्वाचे आहे. डोळे मिचकावल्याने डोळ्यांच्या पृष्ठभागावर नैसर्गिक अश्रूंचा पातळ थर टिकून राहण्यास मदत होते, ज्यामुळे ते ओलावा टिकून राहते आणि धूळ आणि घाणीपासून त्यांचे संरक्षण होते.

## अंकुर बालविकास केंद्र, लातूर येथे बालिका दिन उत्साहात साजरा




**लातूर/प्रतिनिधी :** अंकुर बालविकास केंद्र, लातूर या ठिकाणी बालिका दिन अत्यंत उत्साहात आणि प्रेरणादायी वातावरणात साजरा करण्यात आला. या कार्यक्रमाची सुरुवात शाळेतील विद्यार्थिनींच्या हस्ते क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेस पुष्प अर्पण करून करण्यात आली. या प्रसंगी अंकुर बालविकास केंद्राचे संस्थापक सचिव तथा शाळेचे मुख्याध्यापक आदरणीय व्यंकट दापेगावकर सर यांनी विद्यार्थिनींना मार्गदर्शन करताना सांगितले की , सावित्रीबाई फुले यांनी स्त्री शिक्षणाची ज्योत पेटवली . आजच्या मुलींनी शिक्षणाच्या बळावर आत्मविश्वासाने पुढे येऊन स्वतःची ओळख निर्माण करावी. मुली सक्षम झाल्या तर समाजही सक्षम होतो. तसेच या कार्यक्रमात संस्थेच्या संस्थापक अध्यक्ष सौ. विजया दापेगावकर मॅडम यांनी आपले प्रेरणादायी मनोगत व्यक्त केले. त्या म्हणाल्या की , आजच्या आधुनिक काळात प्रत्येक क्षेत्रामध्ये स्त्रिया आघाडीवर आहेत. शिक्षण, राजकारण, समाजकारण तसेच विविध व्यावसायिक क्षेत्रांमध्ये स्त्रियांनी आपले कर्तृत्व सिद्ध केले आहे . आज स्त्रियांना जे शिक्षणाचा हक्क मिळाला आहे, त्या हक्काच्या पायाभरणीत क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांचे योगदान अतुलनीय आहे. त्यांच्या विचारांमुळेच आज स्त्री शिक्षणाची वाट अधिक प्रकाशमान झाली आहे. या कार्यक्रमाला शाळेतील सर्व शिक्षकवृंद उपस्थित होते. शिक्षकांनीही विद्यार्थिनींना बालिका दिनाच्या शुभेच्छा देत त्यांच्या उज्ज्वल भविष्यासाठी शुभेच्छा व्यक्त केल्या. बालिका दिनानिमित्त आयोजित या कार्यक्रमामुळे विद्यार्थिनींमध्ये आत्मसन्मान, स्वावलंबन आणि शिक्षणाबाबत सकारात्मक दृष्टीकोन निर्माण झाला. संपूर्ण कार्यक्रम अत्यंत उत्साहपूर्ण आणि प्रेरणादायी वातावरणात पार पडला.

## वादविवाद स्पर्धेत दयानंद विधी महाविद्यालयाचा दणदणीत विजय



लातूर/प्रतिनिधी : शिक्षणमहर्षी तात्यारावजी मोरे यांच्या स्मरणार्थ आयोजित ४१ व्या आंतरमहाविद्यालयीन वादविवाद स्पर्धेत लातूर येथील दयानंद विधी महाविद्यालयाने आपल्या प्रभावी वक्तृत्वाने व बौद्धिक सखोलतेने प्रथम क्रमांक पटकावत दणदणीत विजय मिळवला. कृत्रिम बुद्धिमत्ता युवा पिढीच्या बौद्धिक विकासासाठी तारक आहे/नाही या समकालीन व विचारप्रवर्तक विषयावर विद्यार्थ्यांनी केलेल्या अभ्यासपूर्ण आणि मुद्देसूद मांडणीने परीक्षकांचे विशेष लक्ष वेधून घेतले.

श्री छत्रपती शिवाजी महाविद्यालय, उमरगा येथे शुक्रवार, २ जानेवारी रोजी झालेल्या या स्पर्धेत सोलापूर, धाराशिव, लातूर व बीड जिल्ह्यातील एकूण १५ महाविद्यालयीन संघांनी सहभाग घेतला होता. दयानंद विधी महाविद्यालय, लातूरच्या पात्रुडकर कस्तुरी व आदिती ढगे यांनी उत्कृष्ट युक्तिवाद, तार्किक विश्लेषण आणि प्रभावी सादरीकरणाच्या बळावर प्रथम पारितोषिक (१०,००१), स्मृतिचिन्ह व प्रमाणपत्र पटकावून महाविद्यालयाचा नावलौकिक वाढवला.

विजेत्यांना भारत शिक्षण संस्थेचे सहचिटणीस डॉ. सुभाष वाघमोडे यांच्या हस्ते पारितोषिक वितरण करण्यात आले. यावेळी बोलताना त्यांनी कृत्रिम बुद्धिमत्तेमुळे शिक्षण, संशोधन आणि करिअर क्षेत्रात निर्माण होणाऱ्या नव्या संधी ओळखून त्यासाठी विद्यार्थ्यांनी सज्ज राहावे, असे आवाहन केले.

या उल्लेखनीय यशाबद्दल दयानंद शिक्षण संस्थेचे पदाधिकारी, महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ. पूनम नथानी, सांस्कृतिक विभागाचे प्रमुख डॉ. प्रमोद शिंदे, मार्गदर्शक प्राध्यापक ॲड. मुस्तफा पठाण तसेच महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक व शिक्षकवृंद यांनी विजेत्या संघाचे मनःपूर्वक अभिनंदन करून पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या. या विजयामुळे दयानंद विधी महाविद्यालयाची शैक्षणिक गुणवत्ता, वक्तृत्व परंपरा आणि विद्यार्थ्यांचा बौद्धिक कस पुन्हा एकदा ठळकपणे अधोरेखित झाला आहे.

## फॅटी लिव्हरची समस्या दूर करतात 'या' बिया, आजपासून सुरु करा सेवन

आजच्या धावपळीच्या जगात बिघडलेली दिनचर्या आणि खाण्याच्या चुकीच्या सवयींचा आपल्या आरोग्यावर थेट परिणाम होतो. या समस्यांपैकी एक म्हणजे फॅटी लिव्हर, जी आता तरुणांमध्येही वेगाने वाढत आहे. फॅटी लिव्हर ही अशी स्थिती आहे ज्यामध्ये यकृताच्या पेशींमध्ये जास्त चरबी जमा होते, ज्यामुळे यकृताचे कार्य बिघडते.

या समस्येचे मुख्य कारण म्हणजे आपला खराब आहार, ज्यामध्ये फास्ट फूड, तळलेले पदार्थ आणि जास्त साखरेचे सेवन समाविष्ट आहे. शिवाय, शारीरिक हालचालींचा अभाव, वाढता लठ्ठपणा आणि जास्त प्रमाणात मद्यपान हे देखील फॅटी लिव्हरला कारणीभूत ठरतात. परंतु काही पोषक तत्वांनी युक्त बियांचे सेवन, फॅटी लिव्हरची समस्या कमी करण्यास मदत करू शकतात..

**भोपळ्याच्या बिया–**

भोपळ्याच्या बियांमध्ये झिंक आणि मॅग्नेशियम भरपूर प्रमाणात असते.जे यकृताचे कार्य सुधारते. त्यात असलेले अँटीऑक्सिडंट्स आणि निरोगी फॅट्स यकृताची जळजळ कमी करण्यास मदत करतात. जर्नल ऑफ न्यूट्रिशनमध्ये प्रकाशित झालेल्या अहवालानुसार, पुरेशा प्रमाणात झिंकचे सेवन फॅटी लिव्हरला रोखण्यास मदत करू शकते.

**ओवा–**

ओव्यामध्ये अँटी इन्फ्लीमेंट्री गुणधर्म असतात जे यकृताची जळजळ कमी करतात.ओवा पचन सुधारते आणि यकृताचे कार्य सुधारते.

**बडीशेप–**

बडीशेपमध्ये विषारी पदार्थ काढून टाकण्याचे गुणधर्म असतात. जे पचन सुधारतात आणि यकृताचे आरोग्य वाढवतात. ते यकृत नैसर्गिकरित्या स्वच्छ करण्यास मदत करते.

# आमची माय मराठी वाचवू या

सातारा येथे भरलेल्या ९९ व्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनातील संमेलनाचे अध्यक्ष विश्वास पाटील यांच्या अध्यक्षीय भाषणाचा संपादीत अंश

माझ्या दृष्टीने ऐतिहासिक सातार्याची भूमी म्हणजे, नीरा नदीच्या खळाळत्या पाण्यापासून ते पल्याड कोल्हापुराकडे वारणेच्या जलप्रवाहापर्यंत, तसेच एका बाजूला महाबळेश्वराच्या पर्वतरांगा आणि खाली पूर्वेकडे माणदेश–आटपडी ते पलीकडे मिरज, कवठे महांकाळपर्यंत पसरलेला जुना विस्तीर्ण मुलूख आमच्या डोळ्यासमोर उभा राहतो. या भूमीतल्या सर्व थोर माताभगिनींना मी मानाचा मुजरा करतो. ही भूमी मराठी नवकाव्याचे आद्य प्रणेते बाळ सीताराम मर्ढेकर यांची आणि तत्त्वज्ञानाची पेठ निर्माण करणारे तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांची. संयुक्त महाराष्ट्राच्या आंदोलनात उतरणारे ॲड. व्ही. एन. पाटील आणि शेखकाका इथलेच. भारताला स्वातंत्र्य मिळाल्यावर पंडित नेहरू आणि आचार्य कृपलानी यांच्या तेव्हाच्या उत्तर प्रांताचे म्हणजेच आजच्या उत्तर प्रदेशाचे मुख्यमंत्रीपद सलग सात वर्षं भूषवणारेसुद्धा सातारचे सुपुत्र होते, ज्यांचं नाव होतं पंडित गोविंद वल्लभ पंत.

सातारा प्रांत म्हणजे एकीकडे इतिहासाच्या धडाडत्या तोफा आणि चौघडे आणि दुसरीकडे लोकसाहित्याचा पदन्यास... घुंगरांचा खणखणाट. यमुनाबाई वाईकर, कांताबाई सातारकर, आक्काताई कर्हाडकर, वर्धनगडचा रामा कुंभार, शाहीर साबळे, स्वातंत्र्य शाहीर निकम, दोन लाख लावण्या लिहिणारे शाहीर पठ्ठे बापूराव तसेच भाऊ फक्कड, शाहीर मनवेकर, साहेबराव नांदवळकर, कृष्णाकाठचे गायक व अभिनेते बालगंधर्व, वाटेगाव वाळव्याचे शाहीर अण्णाभाऊ साठे. सातारा प्रांत म्हणजे खर्या अर्थी साहित्यरत्नांच्या खाणी. ज्यामध्ये आहेत कृष्णेकाठचे जुन्या पिढीतले महान नाटककार देवल, खाडिलकर तसेच साहित्यात माणदेशाचा मळा फुलवणारे ग. दि. माडगूळकर, व्यंकटेश माडगूळकर आणि शंकरराव खरात ते वामन ओव्हाळ. कोरेगावचे कादंबरीकार ना. ह. आपटे, ग. ल. ठोकळ, श्री. म. माटे मास्तर, कवी यशवंत, गिरीश, वसंत कानेटकर,

मुळात न्यायमूर्ती रानडे यांनी साहित्य संमेलनाचा घाट घातला, त्या वेळी त्यांचं वय ३८ वर्षांचं होतं. नंतर बावीस वर्षांनी याच महादेव गोविंदांनी 'मराठा सत्तेचा उदयास्त' नावाचा मौलिक ग्रंथ लिहून प्रबोधनाला खर्या अर्थी इथे चालना दिली. देशाच्या आझादीचे आंदोलन असो की, संयुक्त महाराष्ट्राची चळवळ किंवा नामांतराचा लढा अगर आणीबाणीसारखा प्रसंग. प्रत्येक ऐतिहासिक आणि निर्णायकी वळणावर मराठी साहित्य संमेलन चार पावले आघाडीवरच राहिले आहे.

१५ ऑक्टोबर १९३८ या दिवशी मुंबईत भरलेल्या २३ व्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचे अध्यक्ष बॅरिस्टर विनायक दामोदर सावरकर होते. जेव्हा साहित्यिकांना 'लेखण्या मोडा आणि तलवारी हाती घ्या' असा संदेश त्यांनी दिला होता, तेव्हा सावरकरांच्या अध्यक्षतेखाली १९३८ मध्ये म्हणजेच ८७ वर्षांपूर्वी भरलेल्या मराठी साहित्य संमेलनात दुसर्या क्रमांकाचा असा ठराव पास झाला होता की, 'हिंदुस्तानातील सर्व प्रमुख देशी भाषांची वाढ होऊन प्राथमिक शिक्षणाप्रमाणेच महाविद्यालयीन 'शिक्षणही त्या त्या प्रांतातील देशी भाषेतून दिले जावे.' संकट येते तेव्हा–तेव्हा गेल्या दोनशे वर्षांत सामाजिक नेतृत्वाची आणि प्रसंगी राजकीय पुढाकाराची भूमिकासुद्धा साहित्यिकांनी उचललेली आहे.

मित्रहो, अध्यक्ष या नात्याने मी मांडलेले विचार हे स्वतंत्र असतील. ते कोणा एका राजकीय संप्रदायाच्या बाजूचे आहेत, की विरोधातले, असे ठरवण्याचा बादरायण खटाटोप कृपया कोणी करू नये. मराठी साहित्य, मराठी भाषा, तिचे अस्तित्व,

मुंबईसारख्या

आमच्या नगरीचे भवितव्य याबाबत काही रोखठोक मुद्दे असतील, जे कोणाला आवडतील किंवा नाहीही; पण ते मांडणे मला क्रमप्राप्त आहे. ते तुम्ही माझ्यावर सोपवलेल्या जबाबदारीचे उत्तरदायित्वच असेल.

माझ्यातल्या कादंबरीकाराला साताराच्या सकस मातीने घडवले आहे ही वस्तुस्थिती. पिण्याचे पाणी आणि शेतीचे पाणी, तसेच ग्रामीण भागातील उद्ध्वस्त माळराने या पार्श्वभूमीवर 'पांगिरा' नावाची कादंबरी मी इथे फलटणच्या वास्तव्यात लिहिली. 'पानिपत'सारखी अव्वल कलाकृतीसुद्धा मला सुचली ती इथे सातार्याच्याच मातीमध्ये. इतकेच नव्हे तर 'झाडाझडती'चा नायक खैरमोडे गुरुजी मला इथेच भेटला.

या भूमीतल्या शेतकर्यांच्या दैन्यावस्थेला हात घालणारा पहिला बंडवाला विद्रोही साहित्यिक म्हणजे महात्मा जोतिबा फुले. ज्यांनी 'शेतकर्यांचा आसूड' नावाची महागाथा १८८१ मध्ये लिहिली. शेतकरी नावाच्या दरिद्रीनारायणाची कैफियत इंग्रज साहेबाला कळावी म्हणून ते सामान्य कुणब्याच्या पेहरावात ब्रिटिश साहेबाला भेटले असे मानतात. शेतकरी वर्गाची परवड आमच्या सदानंद देशमुख यांनी आपल्या 'बारोमास' कादंबरीमध्ये उत्तम पद्धतीने मांडली आहे. व्यंकटेश माडगूळकरांची 'काळी आई', आनंद यादवांचा 'गोतावळा', उद्धव शेळके यांची 'धग', र. वा. दिघे यांची 'आई आहे शेतात' अशा आमच्या साहित्यकृतींनी शेतकर्यांच्या व्यथा आणि वेदना मांडल्या आहेत; मात्र एका गोष्टीचे मला खूप दुःख वाटते, ते असे की, आमच्या पिढीतल्या साहित्यिकांनी जाणीवपूर्वक शेतकरी आत्महत्यांच्या दुष्ट पर्वामागच्या दु:खाची कारणमीमांसा आपल्या साहित्यातून सखोलपणे व्यक्त करायला हवी होती.




बळीराजांच्या आत्महत्यांचे विषारी पर्व म्हणजे या भूमीतील सर्व राजकीय पक्षांचे, समाजाचे नव्हे तर आम्हा लेखक, कलावंतांचेसुद्धा अपयश आहे. मातीतून मोती फुलवणार्या गरीब कष्टकर्यांना झाडाला टांगून स्वतःचे जीवन संपवताना किती यातना होत असतील. गेल्या ४४ वर्षांत शेतकर्यांच्या आत्महत्येमागचे कारण शोधणे आणि त्याचे निवारण करणे हे कोणालाही जमलेले नाही, अन् खरे कारण म्हणजे काय, तर शेतकर्याला शेतीचा धंदा करणेच परवडत नाही. म्हणून तो म्हणे मरणाला मिठी मारतो. याच्या उलट गेल्या ४४ वर्षांत म्हणजेच जवळपास गेल्या अर्धशतकाच्या प्रवासात, कोणाही सरकारी अधिकार्याच्या कुटुंबाने किंवा त्यांच्या नातेवाईकाने, अगर साध्या नगरपालिकेच्या लोकप्रतिनिधीपासून संसदेपर्यंतच्या कोणत्याही राजकीय पक्षाच्या लोकप्रतिनिधीने अगर त्याच्या जवळच्या नातेवाईकाने सुरू केलेला कोणताही धंदा कधी बुडाला आहे, असे कोणाला दाखून देता देईल का? मग बिचार्या शेतकर्याच्याच वाट्यास हे असे दु:खी जीवन का यावे?

आज इथे या ठिकाणी, एका शेतकरी मातेचा पुत्र साहित्य संमेलनाचा अध्यक्ष झाला, या गोष्टीची जाणीव ठेवून मी शासनाकडे कळकळीची विनंती करतो आहे की, लाडक्या बहिणीप्रमाणेच मातीशी झट्या घेऊन धान्य पिकवणार्या प्रत्येक शेतकर्याच्या पत्नीचा व मातेचा गौरव व्हायला पाहिजे. त्यासाठी 'लढाऊ धरतीमाता' नावाची नवी योजना हाती घ्यावी. एकीकडे त्या मतदान करण्यासाठी उपयोगी पडतीलच; पण त्याचवेळी जात शेतकर्याची असल्यामुळे त्या अन्नधान्य पिकवण्याचा आपला मूळ धर्मसुद्धा अजिबात विसरू शकणार नाहीत, याची मला खात्री आहे.

आज आम्ही वि. वा. शिरवाडकर तथा कुसुमाग्रज यांचा जन्मदिवस हा 'मराठी भाषादिन' म्हणून साजरा करतो; पण त्याच वेळी याच शिरवाडकरांनी 'मंत्रालयाच्या दारासमोर चिंध्या पांघरून माय मराठी उभी आहे.' अशी खंत बोलून दाखवली होती. आपल्या स्वातंत्र्याला अर्धशतक लोटल्यावर स्वातंत्र्यदेवीची विनवणी करणारा एक फटका त्यांनी लिहिला होता. ज्याचे पोस्टर बनवून मुख्यमंत्री मनोहर जोशी यांनी ते सर्व सरकारी कार्यालयाच्या भिंतीवर डकविण्याचे धाडस दाखवले होते. काय होते त्या महाकवीचे शब्द?

पन्नाशीची उमर गाठली अभिवादन मज करू नका
मीच विनविते हात जोडुनी वाट वाकडी करू नका
पर भाषेतही व्हा पारंगत ज्ञानसाधना करा, तरी
माय मराठी मरते इकडे परकीचे पद चेपू नका

मला वाटते, तात्यासाहेबांनी परक्या भाषेची पाय दाबण्याची ही कल्पना ज्या महापालिकांनी 'हुरळली मेंढी लागली इंग्रजी लांडग्यांच्या पाठी' अशी वृत्ती जोपासली आहे, त्यांच्यासाठीच खास लिहिल्या असाव्यात.

करा कायदे परंतु हटवा जहर जातीचे मनातूनी
एकपणाच्या मारुनी बाता ऐन घडीला चळू नका
जन सेवेस्तव असे कचेरी ती डाकूंची नसे गुहा
मेजाखालुनी मेजावरतूनी द्रव्य कुणाचे लुटू नका
लाख लाख जण मेले माझ्यासाठी हे विसरू नका
मीच विनविते हात जोडुनी वाट वाकडी करू नका

आजकाल ज्या शाळांमध्ये विद्यार्थ्यांची संख्या एक हजारपेक्षा कमी असेल. तिथल्या ग्रंथपालांचे पद आपण काढून टाकतो; पण मुळात एक हजार विद्यार्थी संख्या असणार्या शाळा प्रत्येक तालुक्यात फक्त चार ते पाच टक्के आहेत. म्हणजे बाकीच्या सर्व शाळांत पाच–पाच, दहा–दहा हजार ग्रंथांची संख्या असताना सरळ त्या ग्रंथालयांना कुलूप लावायचे. यालाच का म्हणायची आपल्या वाचनसंस्कृतीची वाढ? का याला समजायचे आम्ही अभिजात भाषेचे स्वागत? नवी ग्रंथखरेदी पूर्णपणे थंडावली आहे. पूर्वीच्या काळात शासन उत्तम ग्रंथनिर्मितीसाठी स्वस्त कागद पुरवायचे. तसला प्रकार आजकाल नाहीच. उलट नव्याने ग्रंथालये चालू करण्यासाठी प्रेरणा वगैरे द्यायचे सोडूनच द्या. ग्रंथालयांचे नवे प्रस्ताव पूर्णतः बंद करण्याचे फतवे आम्ही आधीच काढले आहेत. १३ कोटींच्या या समृद्ध ऐतिहासिक महाराष्ट्रामध्ये मराठी ललित पुस्तकांच्या विक्रीची किती दुकाने आहेत? फक्त पस्तीस! यावेळी दारूची दुकाने राज्यभर किती आहेत, हा प्रश्न आम्ही विचारत नाही. महाराष्ट्रात ३६ जिल्हे आहेत. त्यांपैकी २० जिल्ह्यांच्या मुख्यालयामध्ये मराठी पुस्तक विक्रीचे दुकानच नाही. दोन कोटीच्यावर मुंबई महानगराची लोकसंख्या आहे. ज्यामध्ये मराठी पुस्तक विक्रीची दुकाने फक्त पाच आहेत. तीही जुन्या मुंबई शहरात. दादरच्या पुढे मुंबईत मराठी पुस्तक विक्रीचे एकही दुकान नाही. म्हणजे कुठे चालली आहे आमची अभिजात मराठी भाषा?

धन्य– धन्य ते ज्ञानोबा तुकोबा!

साहित्य संमेलनाचा अध्यक्ष म्हणून ज्या जिल्ह्यांच्या मुख्यालयात ग्रंथविक्रीची दुकाने नाहीत, तिथे स्वत: जाऊन मराठी भाषक आणि ग्रंथप्रेमी मंडळीच्या सहकार्याने त्या त्या भागात अशी विक्री व्हावी म्हणून मी स्वत: प्रयत्न करणार आहे; पण मी मुख्यमंत्री महोदयांकडे फक्त दोन छोट्या मागण्या करणार आहे.

या राज्यातील सर्व एस.टी. बस स्थानकांवरील आणि रेल्वेस्थानकांवरील वृत्तपत्र आणि पुस्तक विक्री दुकानांची मुद्दाम डोंगरासारखी भाडी वाढवली गेली. मग मिठाईवाले आणि इतर विक्रेत्यांना चढा भाव घेऊन दुकाने देण्याची व्यवस्था झाली. तरी कृपया विशेष लक्ष घालून ही दुकाने माय मराठीसाठी पुन्हा सुरू करण्यात यावी. केंद्र आणि राज्य शासनाने लेखक आणि प्रकाशक यांच्यावर जो १८ टक्के जी.एस.टी लावला आहे. तो तत्काळ रद्द करावा कारण मुळात प्रकाशन व्यवसायच आतबट्ट्यातला आहे.

शासन नव्हे तर समाजानेसुद्धा ग्रंथ आणि संस्कृतीकडे मोठ्या मनाने पाहायला शिकले पाहिजे. अनेकदा आपल्या कुटुंबातले चार सदस्य मल्टीप्लेक्समध्ये जातात. चारशे रुपयांचे प्रत्येकी एकप्रमाणे पॉपकॉर्न खुशीने खातात आणि ते खाता–खाता मराठी पुस्तकांच्या किमती खूप भडकल्या असून ३०० रुपयाच्या खाली पुस्तक मिळत नाही, असा गंभीर मुद्रेने विचार करतात. आज घराघरामध्ये आमच्या देव्हार्याचा विस्तार वाढला आहे; पण अनावश्यक धोंड म्हणून घराघरातली व्यक्तिगत छोटी ग्रंथालये नष्ट झाली आहेत. मराठी भाषेमध्ये जी थोडीफार पुस्तके खपत असतील, त्यांनासुद्धा आज पायरसीच्या वाळवीणे हैराण करून सोडले आहे.

२०१२ पासून राज्यातल्या मराठी शाळेच्या कोणत्याही नव्या तुकडीला शासकीय अनुदान मिळत नाही. म्हणजेच गेल्या १३ वर्षांत एकही नवी मराठी शाळा सुरू झालेली नाही. २०२५ मध्ये एका आकडेवारीनुसार एका वर्षात ६५ नव्या इंग्रजी माध्यमाच्या शाळांना मंजुरी मिळालेली आहे. एकट्या मुंबईत या कालावधीत १०६ मराठी शाळा बंद करण्याचा आम्ही पराक्रम घडवून आणला आहे. बाहेरगावी काय घडले असेल याची पुरी माहिती नाही.


इंग्रजीसारख्या भाषेला कैवारी कमी आहेत म्हणून की काय, मुंबई आणि नागपूरसारख्या महापालिकांनी स्वत:च्या इंग्रजी शाळा सुरू करण्याचा आचरट उद्योग आरंभला आहे. ज्या मराठी शाळांमध्ये २० पेक्षा संख्या कमी पटसंख्या असेल, तर ती शाळा बंद करून तिथली शाळा जवळच्या दुसर्या शाळेत हलवायची आणि ह्या सार्या डामरट उद्योगाला 'सक्षमीकरण' असं गोंडस नाव द्यायचं. वास्तवात हे सक्षमीकरण आम्ही मराठी शाळांचं करतोय की, इंटरनॅशनल स्कूलवाल्यांचं, हाच खरा प्रश्न आहे.

संयुक्त महाराष्ट्रात आम्ही मुंबई मिळवली, तेव्हा आमची संख्या ५०–५२ टक्के होती. २००१ च्या जनगणनेनुसार ती आता ३० टक्क्यांवर आली. नंतर २०११ च्या आकड्यानुसार साधारण ती संख्या ३५ टक्के झाली. आता तर ती त्याहून खूप खाली निचांकावर जाऊन पोचली आहे. गिरगाव, दादर, पार्ला सारं खाली होत आहे. आम्हां सर्वांच्या डोक्यावरून पुनर्वसन आणि स्थलांतराचा वरवंटा फिरतो आहे; पण मलबार हिल इंद्रपुरी नावाच्या जागेच्या पुर्नवसनाचा प्रस्ताव कधी परमेश्वरालासुद्धा स्वप्नात बघायला मिळणार नाही.

भाषा मराठी हीच असावी आमच्या ललाटी!

म्हणून बाप होऽऽ सातार्याची ही पवित्र भूमी सोडताना एक पवित्र शपथ घेऊ या.

**आमची माय मराठी वाचवू या.**
**फक्त ज्ञानोबा आणि तुकोबाच्या पालख्या नाचवू या!**



# लिव्हर खराब होण्याची लक्षणे

*त्वचा आणि डोळे पिवळे पडणे (कावीळ), पोटात सूज व दुखणे, पाय आणि घोट्यांना सूज येणे, खूप थकवा जाणवणे, त्वचेला खाज सुटणे, गडद लघवी, फिकट रंगाची शी, उलट्या किंवा मळमळ आणि भूक न लागणे ही आहेत; ही लक्षणे दिसल्यास ताबडतोब डॉक्टरांचा सल्ला घेणे महत्त्वाचे आहे, कारण सुरुवातीच्या टप्प्यात यकृताच्या आजाराची लक्षणे दिसत नाहीत.*

**सामान्य लक्षणे**

कावीळ: त्वचा, डोळे आणि नखे पिवळसर दिसणे.

थकवा आणि अशक्तपणा: सतत खूप थकल्यासारखे वाटणे.

**पोटाच्या समस्या:** पोटात दुखणे, सूज येणे (उदरजलाय किंवा रीलळींशी).

सूज: पाय आणि घोट्यांवर सूज येणे (शवशार).

**त्वचेला खाज:** सतत खाज सुटणे.

**लघवी आणि शौचास बदल:** गडद रंगाची लघवी आणि फिकट रंगाची किंवा डांबरी रंगाची शी.

मळमळ आणि उलट्या: भूक न लागणे, मळमळ होणे.

**रक्तस्राव आणि जखमा:** सहज जखमा होणे किंवा रक्तस्राव होणे

**मेंदू आणि वर्तनातील बदल**

विसरभोळेपणा: गोंधळल्यासारखे वाटणे, स्मरणशक्ती कमी होणे.

**झोपेचे विकार:** झोप न लागणे किंवा जास्त झोप येणे.

**इतर लक्षणे:**

**रक्ताच्या उलट्या:** रक्त उलट्या होणे किंवा शौचातून रक्त जाणे.

अँजिओमा: त्वचेवर कोळीच्या जाळ्यासारख्या बारीक शिरा दिसणे

डॉक्टरांना कधी भेटावे

यापैकी कोणतीही लक्षणे, विशेषतः अनेक लक्षणे एकत्र आढळल्यास, त्वरित डॉक्टर किंवा यकृत तज्ञाचा सल्ला घ्यावा. यकृत रोग अनेकदा सुरुवातीच्या टप्प्यात लक्षणे दाखवत नाहीत, म्हणून लक्षणे दिसल्यास यकृताचे नुकसान झालेले असू शकते, असे समजावे

## डॉक्टर टीप्स

### या वयात महिला होऊन जातात अधिक रोमँटिक, वाढू लागते इच्छा(कलिंगड)ने

अंगावरून पांढरे पाणी जाणे (White Discharge) आपल्या वेबसाईटवर अंगावरून पाणी जाणे (थहळींश वळीलहरीसश) याविषयी अनेक प्रश्न विचारले गेले आहेत. कोणत्या परिस्थितीमध्ये योनीतून पांढरे पाणी जाते हे समजून घेणे आवश्यक आहे. म्हणूनच योनीतून होणाऱ्या पांढऱ्या स्रावाविषयी थोडक्यात माहिती लिहित आहे याचा तुम्हाला निश्चितच फायदा होईल.

स्त्रीच्या योनीतून स्राव होणे याला अंगावरून पांढरे पाणी जाणे असेही म्हंटले जाते. अंगावरून जाणारा पांढरा स्राव याविषयी माहिती असेल तर हा स्राव नैसर्गिक आहे की, आजारामुळे त्यात काही बदल झाला आहे हे समजून घेता येईल.



## विनोद




झंम्प्या : साहेब ह्यावेळी तुम्ही माझा पगारात २०० रुपये कमी दिलेत

साहेब : अरे वा गेल्यावेळी तुला पगारात चुकून २०० रुपये जास्त दिले होते..

झंम्प्या : हो साहेब पण ती तुमची पहिलीच चुक होती म्हणून मी तेव्हा गप्प होतो...

## संदेश

Paaro To Devdas

Paaro: Kiya Tum Mere liye Chand tod k la sakte ho??

?

?

Devdas: Phir Dharti k Chakker Kiya Tera Baap lagayega?..

## सुविचार




सुविचार हाच सुखाचा आधार.
– अज्ञात

**संस्कृत सुभाषित**

**बुभुक्षितैर्व्याकरणं न भुज्यते । पिपासितैः काव्यरसो न पीयते ।**
**न च्छन्दसा केनचिदुद्धृत कुलं । हिरण्यमेवार्जय, निष्कला गुणा: ।**

**अर्थ :** ज्याला कडकडून भूक लागलेली आहे, त्याला व्याकरणाच्या भोजनाचा उपयोग नसतो, जो तहानलेला आहे, त्याची तहान काव्यरसाने भागत नाही (भुकेला भोजनच लागते व तहानेला पाणीच लागते), तसेच वेदांचा अभ्यास करून कुळाचा उद्धार होत नाही तर संपत्तीशिवाय (सोन्याशिवाय) सारे गुण हे निष्फळ ठरतात.

# मनोरंजक महाशब्दकोडे



## आडवे शब्द

१. धूर्त, लबाड
४. भेग, चीर
७. शंकराचे एक नाव
१०. शहर
११. सोसाट्याचा वारा
१२. कलावंत
१३. आशीर्वाद देणारा
१५. शाब्दिक चकमक
१७. ओटा, कट्टा
१८. अज
२०. काटेरी आंबटगोड फळ
२१. वटवट, त्रास
२३. अंतरिक्ष
२४. शंभर पैशांचे नाणे
२६. घेतलेले रूप, मुखवटा
२७. द्रव्य, पैसा
२८. चांदण्याचा ऋतू
३०. हावरटपणा
३२. भीती
३३. कुबेराचा सेवक
३४. स्तुती करणारा
३६. विशेष
३८. पुष्परस
३९. मोठा शिस्तीचा
४१. घामाघूम होणे
४३. नजरफेक
४५. यात्रेस जाणे
४६. सोन्याचा धागा
४७. रेशमी धोतर
४८. महिरप
५०. कमनीय
५२. बारीकसारीक माहितीसह
५४. मनाचा ओढा
५५. पाने कुरतडणारी
५६. मोठी उथळ वाटी
५८. साखरेची फुगीर वडी
५९. दुर्दशा
६२. मदत
६३. अधिकार, अम्मल
६४. सिद्धता
६५. पांढरपेशा
६७. पांढराशुभ्र प्राणी
६८. क्षमाशील
७०. थोडे, मित
७१. नवरा
७२. शपथ
७३. वात्रट
७६. उद्धट, गर्विष्ठ
७७. परवशता

## उभे शब्द

१. कर्णेंदिय,२. गतिमान
३. पोते
४. हाक
५. सुटकेचा मार्ग
६. कर्नाटकातील सोन्याच्या खाणीचे गाव
७. देशी शीतपेय
८. शिव्यांनी युक्त
९. नवरदेव
११. खटला दाखल करणारा
१२. अलमारी, दरवाजा
१४. रावण
१६. गाईंचे पिल्लू
१९. युक्ती
२०. पुष्कळ
२१. अंदाज, तर्क
२२. शिखराचे टोक
२३. सदऱ्याचा लांबलचक प्रकार
२५. बदल
२६. हत्तीचे नाक
२७. जलप्रपात
२९. संरक्षण करणारा
३१. मध्यस्थ
३४. ज्वारीची चपाती
३५. पोट
३७. कायदेशीर
३८. अंत:करण
४०. डोंगराची उतरण
४१. नृत्यकला अवगत असलेला
४२. नामघोष
४४. हिंमत
४७. चषक
४९. दाणे कुटण्याचे बिनविजेचे साधन
५०. पुरुषांच्या कानावरील अलंकार
५१. गच्चू, दाटीवाटीने
५२. संरक्षक भिंत
५३. बातमीदार
५५. सामान्य प्रतीचा
५६. दक्ष राजाची कन्या
५७. ठरविलेला बेत
५९. परीक्षा घेणारा
६०. पाट्याचा जोडीदार
६१. दोरा
६२. नेहमी
६३. टोळीचा प्रमुख
६६. राख
६७. अभिवादन (हिंदी)
६९. पोत्याचे कापड
७०. कृष्णकथेतील वृक्ष
७२. वजन
७४. गाडीचे छत
७५. किंमत

## आडवे उत्तर

१.कावेबाज ४.सपाट ७.सदाशिव १०.नगर ११.वादळ १२.कलाकार १३.वरद १५.वादावादी १७.पार १८.बकरा २०.अननस २१.कटकट २३.अंतराळ २४.रुपाया २६.सोंग २७.धन २८.शरद ३०.लसलस ३२.डर ३३.यक्ष ३४.भाट ३६.खास ३८.मध ३९.कडक ४१.गदगदणे ४३.नयनबाण ४५.वारी ४६.जर ४७.कद ४८.मखर ५०.बाकदार ५२.तलशीलवार ५४.कल ५५.अळी ५६.सट ५८.बत्तासा ५९.पनवती ६२.सहकार्य ६३.सत्ता ६४.तयारी ६५.पगारदार ६७.ससा ६८.क्षमावंत ७०.कम ७१.दादला ७२.भाक ७३.टारगट ७६.मग्रूर ७७.परावलंबन

## उभे उत्तर

१.कान २.वेगवान ३.बारदान ४.साद ५.पळ–वाट ६.कोलार ७.सरबत ८.शिवराळ ९.वर ११.वादी १२.कपाट १४.दशानन १६.वासरू १९.करामत २०.अतिशय २१.कयास २२.कळस २३.अंगरखा २५.पालट २६.सोंड २७.धबधबा २९.रक्षक ३१.लवाद ३४.भाकर ३५.उदर ३७.सनदशीर ३८.मन ४०.डगर ४१.नर्तक ४२.गजर ४४.धमक ४७.कप ४९.खलबत्ता ५०.बाळी ५१.दाटून ५२.तट ५३.वार्ताहर ५५.असातसा ५६.सती ५७.कार्यक्रम ५९.परीक्षक ६०.वरवंटा ६१.धागा ६२.सदा ६३.सरदार ६६.रक्षा ६७.सलाम ६९.तरट ७०.कदंब ७२.भार ७४.टप ७५.भाव



# क्रीडा विश्व

## थोडक्यात/ संक्षिप्त

### रुट-ब्रूकने ऑस्ट्रेलियाच्या अपेक्षेवर फेरले 'पाणी'; खराब हवामानाने पहिल्या दिवसाच्या खेळात व्यत्यय

सिडनी-सिडनी क्रिकेट ग्राउंडवर ऑस्ट्रेलिया आणि इंग्लंड क्रिकेट संघातील अ‍ॅशेस मालिकेतील पाचव्या कसोटी सामन्याचा पहिल्या दिवसाचा खेळ संपला आहे. इंग्लंडने नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाजी करण्याचा निर्णय घेतला, परंतु त्यांची सुरुवात निराशाजनक होती. मात्र, यानंतर जो रुट आणि हॅरी ब्रूक यांच्यातील महत्त्वपूर्ण भागीदारीमुळं इंग्लंडला २११३ धावांपर्यंत मजल मारता आली. मात्र खराब प्रकाश आणि पावसाने दिवसाच्या खेळात व्यत्यय आणला परिणामी तिसऱ्या सत्राचा खेळ होऊ शकला नाही. इंग्लंडची खराब सुरुवात : इंग्लंडचा डाव सुरु झाला तेव्हा बेन डकेट फक्त ३५ धावांवर बाद झाला, मिशेल स्टार्कने २७ धावांवर यष्टीरक्षक अ‍ॅलेक्स कॅरीकडे त्याला झेलबाद केले. त्यानंतर जॅक क्रॉलीला १६ धावांवर मायकेल नेसरने एलबीडब्ल्यू बाद केले. त्यानंतर जेकब बेथेल १० धावांवर पॅव्हेलियनमध्ये परतला आणि इंग्लंडची अवस्था ५७३ अशी दयनीय झाली.रुट-ब्रूकने इंग्लंडला सावरले : इंग्लंड कठीण परिस्थितीत असतानाही, जो रुट आणि जॅक क्रॉलीने डाव सावरला.

### बांगलादेशचा आधी भारतात खेळण्यास नकार, आता थेट टी-२० वर्ल्डकपसाठी संघाची घोषणा, कर्णधारपदी शॉकिंग निवड

मुंबई-मुस्तफिजूर रहमानवरून सुरू असलेल्या वादाच्या पार्श्वभूमीवर बांगलादेशने टी-२० वर्ल्ड कप २०२६साठी आपल्या संघाची घोषणा केली आहे. १५ खेळाडूंच्या या संघाची धुरा लिटन दासकडे सोपवण्यात आली आहे. विशेष म्हणजे, टी-२० वर्ल्ड कप २०२६ मधील बांग्लादेशचा मोहीम पहिल्याच दिवशी म्हणजे ७ फेब्रुवारीपासून सुरू होणार आहे. भारत-बांगलादेश क्रिकेट संबंधांमध्ये तणाव निर्माण करणाऱ्या मुस्तफिजूर रहमानलाही या संघात स्थान देण्यात आले आहे. आधी भारतात खेळण्यास नकार, आता थेट टी-२० वर्ल्डकपसाठी संघाची घोषणा मुस्तफिजूर रहमानला आयपीएल २०२६ मधून बाहेर काढल्यानंतर मोठा वाद निर्माण झाला असून, त्याच पार्श्वभूमीवर आयसीसी स्पर्धेसाठी बांगलादेशच्या संघाची घोषणा करण्यात आली आहे. मुस्तफिजूरला डावलण्यात आल्यामुळे बांगलादेशचे क्रीडा मंत्रालय संतप्त असून, हा प्रकार बांगलादेश क्रिकेट आणि खेळाडूचा अपमान असल्याचे त्यांचे मत आहे. क्रीडा मंत्रालयाच्या सूचनेनुसारच बांगलादेश क्रिकेट बोर्डाने कडे ई-मेलद्वारे याबाबत स्पष्टीकरण मागितले आहे.

### बांगलादेशचा संपूर्ण प्लॅन उध्वस्त, टी-२० वर्ल्डकपच्या तोंडावर बीसीसीआय ने मॅच शिफ्टिंगची मागणी धुडकावून लावली

मुंबइ-मुस्तफिजूर रहमानला आयपीएलमधून बाहेर काढल्यानंतर त्याचे पडसाद आता थेट आंतरराष्ट्रीय क्रिकेटमध्ये उमटताना दिसत आहेत. या प्रकरणावर बांगलादेश क्रिकेट बोर्डाकडून मंगळवारी रात्री सुमारे ९.३० वाजता तातडीची बैठक घेतली. या बैठकीत टी-२० वर्ल्ड कप २०२६ मधील भारतात होणाऱ्या आपल्या सामन्यांचे वेन्यू बदलून श्रीलंकेत हलवण्याचा महत्त्वाचा निर्णय घेण्यात आला. भारतात सामने खेळण्याऐवजी श्रीलंकेत सामने आयोजित व्हावेत, अशी बांगलादेश क्रिकेट बोर्डाची ठाम इच्छा असल्याचे समजले. या निर्णयामुळे आगामी टी-२० वर्ल्ड कपभोवतीचा राजकीय आणि क्रीडा वाद अधिकच चिघळण्याची शक्यता निर्माण झाली आहे. बीसीसीआय कडून या प्रकरणावर प्रतिक्रिया-या घडामोडीनंतर आता भारतीय क्रिकेट नियामक मंडळाकडून या प्रकरणावर प्रतिक्रिया समोर आली आहे. बीसीसीआयच्या एका वरिष्ठ सूत्राने स्पष्ट शब्दांत सांगितले की, स्पर्धेला अवघा एक महिना शिल्लक असताना सामने दुसऱ्या देशात हलवणे जवळपास अशक्य आहे.

### व्वा रे बीसीसीआय चा न्याय! व्हिएचटी मध्ये ५ सामन्यात ५१४ धावा करणाऱ्या खेळाडूला दिले नाही संघात स्थान

मुंबई-बीसीसीआयच्या वरिष्ठ पुरुष निवड समितीनं न्यूझीलंडविरुद्धच्या आगामी तीन सामन्यांच्या वनडे मालिकेसाठी संघ जाहीर केला आहे. नियमित कर्णधार शुभमन गिल आणि उपकर्णधार श्रेयस अय्यर या मालिकेसाठी संघात परतले आहेत. अय्यर अजूनही पूर्णपणे तंदुरुस्त नाही आणि फिटनेस चाचणी उत्तीर्ण झाल्यानंतरच त्याला वनडे मालिकेत खेळण्याची परवानगी दिली जाईल. मालिकेसाठी संघ जाहीर होण्यापूर्वी, विजय हजारे ट्रॉफीम ध्ये चांगली कामगिरी करणाऱ्या खेळाडूंना वनडे संघात समाविष्ट केलं जाऊ शकतं अशी अटकळ होती, परंतु अद्याप तसे झालेले नाही.देवदत्त पडिक्कलने केल्या खोऱ्याने धावा : विजय हजारे ट्रॉफी २०२५-२६ मध्ये, एक खेळाडू आहे जो फलंदाजीत खोऱ्यानं धावा काढत आहे, परंतु कोणीही त्याच्याबद्दल बोलत नाही. तो खेळाडू म्हणजे देवदत्त पडिक्कल. विजय हजारे ट्रॉफीमध्ये पडिक्कलची बॅट सध्या मोठ्यानं बोलत आहे.

## ऑलिम्पिक यजमानपद मिळविण्यासाठी भक्कम पावले! नरेंद्र मोदी यांची ग्वाही



भारतातच या स्पर्धा घेण्यासाठी जोरदार प्रयत्न सुरू असल्याची ग्वाही पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी रविवारी दिली. भारत २०३६ मधील ऑलिम्पिक क्रीडा स्पर्धांचे आयोजन करण्यासाठी पूर्ण ताकदीने तयारी करत आहे. भारतातच या स्पर्धा घेण्यासाठी जोरदार प्रयत्न सुरू असल्याची ग्वाही पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी रविवारी दिली. वरिष्ठ गटाच्या राष्ट्रीय व्हॉलीबॉल स्पर्धेच्या उद्घाटनप्रसंगी मोदी बोलत होते. आभासी पद्धतीने मोदी उद्घाटन सोहळ्यात सहभागी झाले होते. ''उदयोन्मुख खेळाडूंना ऑलिम्पिक खेळात सहभागी होण्याची संधी देण्यासाठी सरकार सर्वोतोपरी प्रयत्न करत आहे. भारत २०३० मध्ये राष्ट्रकुल स्पर्धेचेही आयोजन करणार आहे. खेलो इंडियासारख्या योजना देशातील क्रीडा प्रतिभा ओळखण्यात आणि पुढे आणण्यात महत्त्वाची भूमिका बजावत आहेत,'' असेही मोदी यांनी या वेळी सांगितले. खेळाडूंना सक्षम करण्यासाठी सरकारची 'टॉप्स' योजना क्रीडा परिसंस्थेत परिवर्तन घडवत असल्याचे सांगून मोदी यांनी गेल्या दहा वर्षांत भारताने २० आंतरराष्ट्रीय स्पर्धांचे आयोजन केल्याची माहिती दिली. याचाच आधार घेत मोदी यांनी 'आज देश सुधारणेच्या गतीवर स्वार आहे, ज्यात प्रत्येक क्षेत्र आणि प्रत्येक विकासाचे उद्दिष्ट जोडलेले आहे आणि क्रीडा हे त्यापैकीच एक आहे,' असे सांगितले. मोदी यांनी आपल्या भाषणातून केंद्र सरकारच्या क्रीडाविषयक विविध योजना आणि खेळांना प्रोत्साहन देणाऱ्या गोष्टींचा आढावा घेतला. गेल्या वर्षी केलेला राष्ट्रीय क्रीडा प्रशासन कायदा आणि खेलो भारत धोरण भविष्यात योग्य प्रतिभेला न्याय देईल, तसेच क्रीडा संघटनांच्या कारभारात पारदर्शकता आणेल, असा विश्वासही मोदी यांनी व्यक्त केला.

खेळातील यश हे समन्वय, विश्वास आणि संघाच्या तयारीवर अवलंबून असते. यात प्रत्येकाची भूमिका महत्त्वाची असते. जेव्हा प्रत्येक जण आपली भूमिका परिश्रमपूर्वक आणि गांभीर्याने पार पाडतो, तेव्हाच आपल्याला यश मिळते. आपला देशही याच मार्गाने प्रगती करत आहे.
– नरेंद्र मोदी, पंतप्रधान

## बांगलादेशचे सामने भारताबाहेर?

### सुरक्षेच्या कारणास्तव श्रीलंकेत खळेविण्याची आयसीसीकडे विनंती

**ढाका:**विश्वचषकातील आमच्या संघाचे सामने भारताऐवजी श्रीलंकेत खेळिवण्यात यावेत अशी विनंती बांगलादेश क्रिकेट मंडळाने (बीसीबी) आंतरराष्ट्रीय क्रिकेट परिषदेकडे (आयसीसी) केली आहे.

भारत आणि बांगलादेश यांच्यातील संबंध अधिकच चिघळण्याची चिन्हे आ-हेत. भारतीय क्रिकेट नियामक मंडळाच्या (बीसीसीआय) सूचनेनंतर 'आयपीएल' संघ कोलकाता नाइट रायडर्सने बांगलादेशचा वेगवान गोलंदाज मुस्तफिझूर रहमानला संघातून मुक्त केले होते. याची गंभीर दखल घेताना बांगलादेशातील क्रीडा मंत्रालयाने आपल्या क्रिकेट मंडळाला आगामी ट्वेन्टी-२० विश्वचषक स्पर्धेसाठी राष्ट्रीय संघाला भारतात न पाठविण्याचे स्पष्ट आदेश दिले. त्यानुसार, आता विश्वचषकातील आम च्या संघाचे सामने भारताऐवजी श्रीलंकेत खेळिवण्यात यावेत अशी विनंती बांगलादेश क्रिकेट मंडळाने (बीसीबी) आंतरराष्ट्रीय क्रिकेट परिषदेकडे (आयसीसी) केली आहे. यासाठी त्यांनी सुरक्षेचे कारण पुढे केले आहे.

'बीसीसीआय'ने मुस्तफिझूरला लीगमधून दूर करण्याचे कारण स्पष्ट केले नाही. परंतु काही दिवसांपासून बांगलादेशात हिंदू धम र्यीयांच्या हत्या होत असल्याने भारतातील काही राजकीय पक्षांनी दडपण आणल्याने 'बीसीसीआय'ने हे पाऊल उचलल्याची चर्चा आहे. अभिनेता शाहरुख खानची सहमालकी असलेल्या कोलकाता नाइट रायडर्सने मुस्तफिझूरला संघमुक्त केल्यानंतर बांगलादेश क्रिकेट मंडळाची (बीसीबी) शनिवारी तातडीची बैठक बोलविण्यात आली. त्यानंतर रविवारी संचालक मंडळाची पुन्हा बैठक झाली आणि ७ फेब्रुवारीपासून सुरू होणाऱ्या ट्वेन्टी-२० विश्वचषकासाठी बांगलादेश संघ भारतात जाणार नाही, असा त्यात निर्णय घेण्यात आला.''मंडळाने गेल्या २४ तासांतील घडामोडींचा विचार केला आणि आगामी काळात भारतात होणाऱ्या सामन्यांमध्ये बांगलादेश संघाच्या सहभागाशी संबंधित एकूण परिस्थितीबद्दल तीव्र चिंता व्यक्त केली. परिस्थितीचे सख-ोल मूल्यांकन केल्यानंतर आणि भारतात बांगलादेश संघाच्या सुरक्षिततेबाबत वाढती चिंता लक्षात घेऊन, तसेच बांगलादेश सरकारचा सल्ला विचारात घेऊन, सध्याच्या परिस्थितीत बांगलादेश क्रिकेट संघ या स्पर्धे साठी भारतात प्रवास करणार नाही असे संचालक मंडळाने ठरवले आहे,'' असे 'बीसीबी'ने प्रसिद्ध केलेल्या निवेदनात नमूद करण्यात आले.



ट्वेन्टी-२० विश्वचषकात बांगलादेशचे चारही साखळी सामने भारतात नियोजित आहेत. त्यामुळे 'बीसीबी'च्या विनंतीचा आता 'आयसीसी'ला गंभीर विचार करावा ला-गेल. सुरक्षेच्या कारणास्तव, पाकिस्तान संघ आपले सर्व सामने श्रीलंकेत खेळणार आहे. बांगलादेशनेही आपले भारतात होणारे सामने श्रीलंकेत हलविण्याची विनंती केली आहे.''बांगलादेशचे सर्व सामने भारताबाहेर (सह-यजमान श्रीलंका) हलविण्याचा विचार करण्याची 'बीसीबी'ने 'आयसीसी'ला औपचारिक विनंती केली आहे. 'बीसीबी' या परिस्थितीबद्दल 'आयसीसी'च्या समजुतीची आणि या प्रकरणावर तातडीच्या प्रतिसादाची अपेक्षा करत आहे,'' असेही 'बीसीबी'च्या निवेदनात स्पष्ट करण्यात आले आहे.

'बीसीबी'ने निवेदन जारी करण्यापूर्वीच, सरकारी सल्लागार आसिफ नझरुल यांनी 'फ ेसबुक'द्वारे बांगलादेश संघ भारतात जाणार नसल्याचे जाहीर केले होते. ''बांगलादेश संघ विश्वचषकात खेळण्यासाठी भारतात जाणार नाही.

## टी-२० विश्व चषकासाठी बांगलादेशच्या क्रिकेट संघाची घोषणा

ढाका-बांगलादेश क्रिकेटपटू मुस्तफिजूर रहमानला आयपीएल २०२६ मधून वगळण्यावरुन सुरु असलेल्या वादाच्या पार्श्वभूम ीवर, बांगलादेश क्रिकेट बोर्डानं ७ फेब्रुवारीपासून भारत आणि श्रीलंका संयुक्तपणे आयोजित होणाऱ्या आयसीसी टी-२० विश्वचषकासाठी आपला संघ जाहीर केला आहे. बांगलादेश क्रिकेट बोर्डानं आगामी मेगा स्पर्धेसाठी अनुभवी यष्टीरक्षक-फलंदाज लिटन दासला कर्णधार म्हणून नियुक्त केलं आहे. बांगलादेशला गट क मध्ये स्थान देण्यात आलं आहे, ज्यात ते ७ फेब्रुवारी रोजी कोलकाता येथील ईडन गार्डन्स स्टेडियम वर दोन वेळा ट्रॉफी विजेत्या वेस्ट इंडिजविरुद्ध पहिला सामना खेळतील.संघात दिग्गज खेळाडूंना स्थान : कर्णधार लिटन दास व्यतिरिक्त तन्झिद हसन आणि परवेझ हुसेन इमॉन यांच्यावर महत्त्वपूर्ण फलंदाजीची जबाबदारी असेल. गोलंदाजीत, संघात अनुभवी मुस्तफिजूर रहमान आणि तस्किन अहमद असतील, तर फिरकी विभाग मेहदी हसन, नसुम अहमद आणि रिशाद हुसेन यांच्याकडे असेल, जे आशियाई परिस्थितीत संघासाठी सामना जिंकणारे गोलंदाजांची भूमिका बजावू शकतात. २००७ पासून बांगलादेशनं प्रत्येक टी-२० विश्वचषकात भाग घेतला आहे, परंतु त्यांना कधीही उपांत्य फ ेरी गाठता आली नाही. त्यामुळं यावेळी त्यांच्या कामगिरीवर बारकाईनं लक्ष ठेवलं जाईल. बांगलादेश संघासाठी एक चांगली गोष्ट म्हणजे ते त्यांचे पहिले तीन गट सामने कोलकाता इथं खेळतील, ज्यामुळं त्यांना तेथील परिस्थितीचं आकलन करण्याची चांगली संधी मिळेल.

२०२६ च्या टी-२० विश्वचषकासाठी बांगलादेशचा संघ :लिटन दास (कर्णधार), म ोहम्मद सैफ हसन (उपकर्णधार), तन्झीद हसन, मोहम्मद परवेझ हुसेन इमोन, तौहिद हृदयॉय, शमीम हुसेन, काझी नुरुल हसन सोहन, महेदी हसन, रिशाद हु-सेन, नसुम अहमद, मुस्तफिजुर रहमान, तन्झीम हसन साकिब, तस्किन अहमद, मोहम्मद शैफ ुद्दीन, शोरीफुल इस्लाम.

बांगलादेशचं टी-२० विश्वचषक वेळापत्रक : लिटन दासच्या नेतृत्वाखाली बांगलादेश संघ ७ फेब्रुवारी रोजी वेस्ट इंडिजविरुद्ध आगामी टी-२० विश्वचषकात आपला पहिला सामना खेळेल. त्यांचा दुसरा सामना ९ फेब्रुवारी रोजी इटलीचा सामना होईल.

## मॅरेथॉनमध्ये तृतीय क्रमांक पटकवल्यानंतर १५ वर्षीय विद्यार्थिनीचा मृत्यू



**डहाणू-**तलासरीच्या वेवजी येथील लोकभारती संस्थेच्या भारती अकादमी इंग्लिश स्कूलम ध्ये क्रीडा महोत्सव सुरू होता. यामध्ये विविध स्पर्धांचा सम ावेश होता .मॅरेथॉन स्पर्धेदरम्यान दु:खद घटना घडली. मॅरेथॉनमध्ये धावणाऱ्या विद्यार्थिनीचा मृत्यू झाला. विद्यार्थिनीने मॅरेथॉनमध्ये तृतीय क्रमांक पटकावलेला. शर्यत पूर्ण केल्यानंतर आलेल्या हृदयविकाराच्या झटक्याने या मुलीचा जीव गेल्याचे सम जते. विजयाचा आनंद साजरा करण्यापूर्वीच काळाने मुलीवर झडप घातली. शर्यत संपल्यानंतर तिला धाप लागत होती. श्वास घेण्यास त्रास होऊ लागल्याने ती मैदानात बसली आणि काही क्षणातच बेशुध्द पडली. शिक्षकांनी तिला तातडीने जवळच्या रुग्णालायत दाखल केले, मात्र उपचारापूर्वीच तिचा मृत्यू झाल्याचे डॉक्टरांनी घोषित केले. या प्रकरणाची नोंद पोलिस ठाण्यात करण्यात आली. ताज्या घटनेमुळे विद्यार्थ्याच्या सुर-क्षतेचा प्रश्न निर्माण झाला आहे. पालकवर्गामध्ये चिंतेचे वातावरण आहे. कडक उन्हात होणारे क्रीडा स्पर्धाचे आयोजन आणि त्यामुळे होणार त्रास , पिण्याच्या पाण्याची गैरसोय आणि उपाशीपोटी स्पर्धत सहभागी होणे . यामुळे विद्या-र्थी आजारी पडतात , त्यांना चक्कर येते किंवा बेशुध्द देखील पडतात. या घटनेमुळे केवळ औपचारिकतेसाठी स्पर्धोच आयोजन न करता शाळांनी विद्यार्थाच्या आरोग्याची आणि सुरक्षतेची जबाबदारी घेतली पाहिजे; अशी मागणी जोर धरू लागली आहे.

## शतक ठोकल्यानंतर या फलंदाजाने केले आक्षेपार्य हावभाव, अन् पुढच्याच क्षणाला

मुंबई-सध्या विजय हजारे ट्रॉफी फारच चर्चेत आहे. विजय हजारे ट्रॉफीमध्ये ३ जानेवारी रोजी कर्नाटक आणि त्रिपुरा यांच्यात सामना खेळाला गेला. खेळल्या गेलेल्या सामन्यात एक वेगळीच घटना घडली. ही घटना फारच विचित्र होती. त्रिप-ुराचा फलंदाज स्वपनिल सिंग याने शतक झळकावल्यानंतर सेलिब्रेशन म्हणून केलेल्या आक्षेपार्ह इशाऱ्यामुळे तो चर्चेत आला. हा प्रकार चुकून घडला की जाणीवपूर्वक, याबाबत मात्र काहीही स्पष्ट झालेले नाही.

आधी शतक, मग वादग्रस्त सेलिब्रेशन

त्रिपुराकडून सातव्या क्रमांकावर फलंदाजी करायला स्वपनिल सिंग आला . त्याने कर्नाटकविरुद्ध दमदार शतक झळकावले. सहाजिकच त्याने शतक ठोकल्यावर आनंद सेलिब्रेट केला. मात्र शतकानंतर त्याने केलेल्या सेलिब्रेशनची पद्धत सर्वांचे लक्ष वेधून घेणारी ठरली. त्याच्या जश्नाचा व्हिडीओ सध्या सोशल मीडियावर मोठ्या प्रमाणात व्हायरल होत आहे.

गोलंदाज म्हणून ओळख, फलंदाजीत छाप

स्वपनिल सिंगची ओळख प्रामुख्याने गोलंदाज म्हणून आहे. मात्र या सामन्यात त्याने फलंदाजीतून सर्वांना आश्चर्यचकित केले. त्याने ९३ चेंडूत १०० धावा करताना ७ चौकार आणि षटकारांची बरसात केली.



ही कामगिरी त्याच्या कारकिर्दीतील खास क्षण ठरली.लिस्ट 'ए' कारकिर्दीतील पहिले शतककर्नाटकने प्रथम फलंदाजी करत देवदत्त पडिक्कलच्या १०८ धावांच्या जोरावर त्रिपुरासमोर ३३३ धावांचे आव्हान ठेवले होते. प्रत्युत्तरात त्रिपुराची अवस्था ५९ धावांत ५ गडी बाद अशी झाली होती. अशा कठीण क्षणी स्वपनिल सिंग मैदानात उतरला आणि संघाची धुरा सांभाळत लिस्ट 'ए' क्रिकेटमधील पहिले शतक झळकावले.

शतकाचा आनंद वादात

हे शतक स्वपनिलसाठी दुहेरी आनंदाचे कारण ठरू शकले असते. मात्र आनंदाच्या भरात त्याने केलेला इशारा अनेकांना खटकणारा वाटला आणि त्यावरूनच वाद निर्माण झाला.

पुढच्याच चेंडूवर बाद

शतकानंतरच्या त्या वादग्रस्त जश्नानंतर लगेचच स्वपनिल सिंग बाद झाला. कर्नाटकच्या विजयकुमार व्यस्कने त्याला १०० धावांवर क्लीन बोल्ड केले. त्याच्या बाद होताच त्रिपुराच्या विजयाच्या आशाही संपुष्टात आल्या. अखेर त्रिपुराचा संघ ४९ षटकांत २५२ धावांवर ऑलआउट झाला आणि कर्नाटकने हा सामना ८० धावांनी जिंकला.

## बांगलादेशच्या क्रिकेटपटूचा अपमान सहन केला जाणार नाही; बांगलादेश आक्रमक

**ढाका: वृत्तसंस्था**

मुस्ताफिझूर रहमानला आयपीएल स्पर्धेतून रिलीज करण्याचा मुद्दा ऐरणीवर आला आहे,

मुस्ताफिझूर रहमान फोटो- इंडियन एक्सप्रेस)

भारत आणि बांगलादेश यांच्यातील दुरावलेल्या संबंधांच्या पार्श्वभूमीवर बीसीसीआयने आयपीएल स्पर्धेतील कोलकाता नाईट रायडर्स संघातील बांगलादेशचा डावखुरा वेगवान गोलंदाज मुस्ताफिझूर रहमानला रिलीज करण्याचे निर्देश दिले आ-हेत. बीसीसीआयच्या निर्देशानुसार कोलकाता नाईट रायडर्स संघाने तातडीने प्रसिद्धीपत्रक जारी करत मुस्ताफिझूरला रिलीज करत असल्याचं स्पष्ट केलं. मुस्ताफिझूरच्या ऐवजी बदली खेळाडू देण्याची तरतूद बीसीसीआयने केली आहे. मात्र अनस-ोल्ड खेळाडूंमधून मुस्ताफिझूरसारखा खेळाडू शोधणं कोलकातासाठी मोठं आव्हान असणार आहे.

दरम्यान मुस्ताफिझूरला रिलीज करण्याच्या मुद्यावरून बांगलादेश आक्रमक झालं आहे.

बांगलादेश सरकारचे सल्लागार असिफ नझरुल यांनी पुढील महिन्यात होणाऱ्या टी२० वर्ल्डकप स्पर्धेतील बांगलादेशचे भारतात होणारे सामने श्रीलंकेत खेळवण्यात यावेत अशी सूचना केली आहे.

### आयपीएलचं प्रसारण बंद होणार



बांगलादेशमध्ये आयपीएलचं प्रसारण होणार नाही यासाठी माहिती आणि प्रसारण मंत्रालयाला सूचित केल्याचं असिफ यांनी स्पष्ट केलं.

'बांगलादेश क्रिकेटचा, क्रिकेटपटूंचा अपमान सहन केला जाणार नाही. बांगलादेशात आयपीएलचं प्रसारण होऊ नये यासाठी सूचना दिल्या आहेत. गुलामीचे दिवस सरले. आता असं चालणार नाही', असं असिफ यांनी सांगितलं.

बांगलादेशमध्ये हिंदू नागरिकांवर होणारे हल्ले आणि अत्याचार या पार्श्वभूमीवर भारतात बांगलादेशविरुद्ध आंदोलनं सुरू आहेत. आयपीएल स्पर्धेत बांगलादेशच्या खेळाडूंना खेळू देऊ नये असाही सूर होता. लोकांच्या भावना लक्षात घेऊन बीसीसीआयने यंदाच्या हंगामातील एकमेव बांगलादेशचा खे-ळाडू मुस्ताफिझूर रहमानला रिलीज करण्याचे आदेश दिले होते. कोलकाता नाईट रायडर्स संघाने निर्देशाचं पालन करत मुस्ताफिझूरला रिलीज केलं.

भारताचे परराष्ट्र मंत्री जयशंकर हे बांगलादेशचे माजी पंतप्रधान खालेदा झिया यांच्या अंत्यसंस्काराला उपस्थित होते. यानंतर आयपीएलमध्ये बांगलादेशच्या खेळाडूला रिलीज करण्यापर्यंत गोष्टी एवढ्या टोकाला जातील याची बांगलादेश क्रिकेट बोर्डाला कल्पना नव्हती. शुक्रवारी बांगलादेश क्रिकेट बोर्डाने सप्टेंबर महिन्यात होणाऱ्या भारतीय संघाच्या बांगलादेश दौऱ्याचं वेळापत्रक जाहीर केलं. मात्र मुस्ताफिझूर रहमानला रिलीज केल्यानंतर बीसीसीआयने हा दौरा स्थगित केल्याचं वृत्त इंडियन एक्स्प्रेसने दिलं होतं. या दौऱ्यासंदर्भात आणि मुस्ताफिझूरला आयपीएलमधून रिलीज करण्यासंदर्भात आम्हाला बीसीसीआयकडून औपचारिकदृष्ट्या कळवण्यात आलेलं नाही. ते कळवल्यानंतर पुढे काय करायचं याचा निर्णय घेऊ असं बांगलादेश क्रिकेट बोर्डातील सूत्रांनी सांगितलं.

मुस्ताफिझूर रहमान हा धावा रोखण्यात आणि विकेट्स पटकावण्यात माहीर आहे. २०१६ पासून तो आयपीएलच्या आठ हंगामात खेळला आहे. सनरायझर्स हैदराबाद, मुंबई इंडियन्स, दिल्ली कॅपिटल्स, चेन्नई सुपर किंग्स, राजस्थान रॉयल्स या संघांकडून खेळला आहे. यंदाच्या वर्षी केकेआरसाठी खेळण्याची त्याची पहिलीच वेळ असणार होती. मात्र आता त्याला खेळता येणार नाही.

# विश्वेश्वरय्याचे १०६ विद्यार्थी ९० टक्के पेक्षा अधिक तर ६५७ विद्यार्थी विशेष प्राविण्यासह उत्तीर्ण

## रामोला शेळके ९६.३५ टक्के गुण घेऊन महाविद्यालयातुन प्रथम




**औसा/प्रतिनिधी:** तालुक्यातील आलमला येथील विश्वेश्वरय्या इंन्स्टिटयुट ऑफ इंजिनीअरिंग अॅण्ड टेक्नॉलॉजी महाविद्यालयाचा महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळाने घेतलेल्या हिवाळी परीक्षा २०२५ चा निकाल घोषित झाला असून महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी उज्ज्वल यशाची परंपरा कायम ठेवत महाविद्यालयातील अंतिम वर्षातील विद्यार्थ्यांनी घवघवीत यश संपादन केले आहे. महाविद्यालयातुन १०६ विद्यार्थी ९० टक्केपेक्षा अधिक गुण घेऊन उत्तीर्ण झाले आहेत तर विशेष प्राविण्यासह ६५७ विद्यार्थी उत्तीर्ण व प्रथम श्रेणीत २२८ विद्यार्थी उत्तीर्ण झाले आहेत. महाविद्यालयाचा अंतीम वर्षाचा निकाल १०० टक्के लागला आहे. महाविद्यालयातील कॉम्प्युटर इंजिनीअरिंग विभागातील रामोला शेळके ९६.३५ टक्के गुण महाविद्यालयातून प्रथम आली आहे.

संगणक अभियांत्रिकी अंतीम वर्षातील राज कांबळे ९६.२४ टक्के गुण घेऊन व्दितीय तर नम्रता गोगाडे ९६.०० टक्के गुण घेऊन तृतीय आली आहे. इन्फॉर्मेशन टेक्नॉलॉजी अंतीम वर्षातुन प्रकाश कंकाळ व श्रुती सुर्यवंशी अनुक्रमे ९६.०० टक्के गुण घेऊन प्रथम, तनहाज मुलानी ९५.६३ टक्के गुण घेऊन व्दितीय तर दिक्षा चौधरी ९५.५३ टक्के गुण घेऊन तृतीय आली आहे. सिव्हील इंजिनीअरिंग अंतीम वर्ष विभागातुन यशराज कानडे ९४.२२ टक्के गुण घेऊन प्रथम, रोहन जाधव ९३.६७ टक्के गुण घेऊन व्दितीय तर पवन जाधव ९३.५६ टक्के गुण घेऊन तृतीय आला आहे. इलेक्ट्रॉनिक्स अॅण्ड टेलिकम्युनिकेशन इंजिनीअरिंग अंतीम वर्षातुन ओंकार गोरे ९४.१२ टक्के गुण घेऊन प्रथम, मानसी घोगरे ९३.१८ टक्के गुण घेऊन व्दितीय तर श्रवण गावकरे ९२.३५ टक्के गुण घेऊन तृतीय आला आहे. इलेक्ट्रीकल इंजिनीअरिंग अंतीम वर्षातुन श्रेया म्हाळगी व शिंदे संध्याराणी अनुक्रमे ९२.७१ टक्के गुण घेऊन प्रथम, जान्हवी रासुरे ९२.४७ टक्के गुण घेऊन व्दितीय तर धनश्री जगताप ९२.३५ टक्के गुण घेऊन तृतीय आली आहे. मेकॅनिकल इंजिनीअरिंग अंतीम वर्षातुन नागेश जावळे ९२.५९ टक्के गुण घेऊन प्रथम, कृष्णा बिराजदार ९०.९४ टक्के गुण घेऊन व्दितीय आणि अपुर्व पांडे ८९.०६ टक्के गुण घेऊन तृतीय आला आहे.

व्दितीय वर्ष सिव्हील इंजिनीअरिंग विभागातुन आदित्य नागुरे ९४.१२ टक्के गुण घेऊन प्रथम, योगिनी कोकाटे ९२.७१ टक्के गुण घेऊन व्दितीय आणि अंकिता सुर्यवंशी ९१.९६ टक्के गुण घेऊन तृतीय आली आहे. कॉम्प्युटर विभागातुन श्रुती गणापुरे ९३.०६ टक्के गुण घेऊन प्रथम, सृष्टी म्हेत्रे ९२.०० टक्के गुण घेऊन व्दितीय तर गायत्री गावकरे ८९.४१ टक्के गुण घेऊन तृतीय आली आहे. इलेक्ट्रॉनिक्स अॅण्ड टेलिकम्युनिकेशन इंजिनीअरिंग विभागातुन पुनम चव्हाण ९२.७८ टक्के गुण घेऊन प्रथम, अमर मेंडोळे ९२.६७ टक्के गुण घेऊन व्दितीय तर स्नेहा सोमवंशी ९२.११ टक्के गुण घेऊन तृतीय आली आहे. इन्फॉर्मेशन टेक्नॉलॉजी विभागातुन इरफान शेख ९२.३५ टक्के गुण घेऊन प्रथम, आसावरी इटकर ९१.४१ टक्के गुण घेऊन व्दितीय तर वैभवी सोमवंशी ९१.२९ टक्के गुण घेऊन तृतीय आली आहे. इलेक्ट्रीकल इंजिनीअरिंग विभागातुन अंतरा आदमाने ९१.१८ टक्के गुण घेऊन प्रथम, समिना मुल्ला ८९.६५ टक्के गुण घेऊन व्दितीय आणि सुधिर बनसोडे ८८.४७ टक्के गुण घेऊन तृतीय आला आहे. मेकॅनिकल विभागातुन अनिकेत कुलकर्णी ८८.५६ टक्के गुण घेऊन प्रथम आणि गायत्री भिंगोले ८७.०० टक्के गुण घेऊन व्दितीय आली आहे. महाविद्यालयातुन श्रेया काळे ९५.६०, दिक्षा चौधरी ९५.५३ टक्के, अफरीन शेख ९५.२९ टक्के, संध्या आळणे ९५.४१ टक्के, ऋषीकेश ढगे ९४.९४ टक्के, कृष्णा पाटील ९४.८२ टक्के, ऋषीकेश देशपांडे ९४.७१ टक्के, राजश्री केंद्रे ९४.५९, अदित्य हवालदार ९४.४७ टक्के, राणी मोरे ९४.३५, यशराज कानडे ९४.२२ टक्के, सायली पाटील व अमृता गावकरे अनुक्रमे ९४.१२ टक्के, ऋतुजा खोसे ९४ टक्के, रितेश चौधरी ९४ टक्के, समीक्षा खुणे ९४ टक्के, संध्या माने ९३.७७ टक्के, मंथन औताडे ९३.०६ टक्के, प्रतिक बिडवे, नेहा लोमटे व अदिनाथ केंद्रे अनुक्रमे ९३.४१ टक्के, ऋषीकेश जगताप व गौरव चिद्रे अनुक्रमे ९३.२९ टक्के, श्रेया बायसठाकुर ९२.८२ टक्के, सई मद्दे ९२.७१ टक्के, वैभवी खुणे ९२.५६ टक्के, निकीता धवन ९२.९४ टक्के, स्नेहल पाटील ९२.५९ टक्के, समीक्षा रूकमे, नेहा मातोळे, हर्षवर्धन सातपुते व स्नेहा लोणारे अनुक्रमे ९२.४७ टक्के, सुमित चंदनशिवे, महेश कोलबुदे ९२.२४ टक्के, रोहित महामुनी, गिताश्री बिराजदार, साधना म्हेत्रे व साक्षी बालागिडे अनुक्रमे ९२.१२ टक्के, शिवम शिदें तांबरवाडे, वैभवी कठारे, आसावरी पाठक, अमन पटेल व असिम शेख ९२.०० टक्के, यश पाटील ९१.८८ टक्के, ऋतुजा जंगाले ९१.७८ टक्के, प्रतिभा बिराजदार व जिंदाशहा फकीर अनुक्रमे ९१.७७ टक्के, ओंकार भोसले ९१.६७ टक्के, श्वेता लोहारे ९१.५३ टक्के, अरबाज सय्यद ९१.१८ टक्के, गौरी जाधव व वेदांत शिंदे ९१.०६ टक्के, कौस्तुभ पवार ९०.८२ टक्के, मन्मथ मेळकुंदे ९०.७१ टक्के, साक्षी करे व श्रुती सुर्यवंशी ९०.८९ टक्के, अदिती सुरवसे, प्रियंका पाटील ९० टक्के गुण घेऊन उत्तीर्ण झाले आहेत.

प्रथम वर्ष विभागातुन कार्तिक मुरकुटे ९०.८२ टक्के, सानिका बिराजदार ९०.०० टक्के, पियुष सुर्यवंशी ८९.४१ टक्के, श्वेता सौदागर ८९.०६ टक्के, सौम्या शिंदे ८८.३५, श्रुती पांचाळ ८८.२४ टक्के, साक्षी टेकाळे ८८.०० टक्के, अथर्व सावंत ८७.५३ टक्के, इनायत काझी ८७.५३ टक्के, कार्तिक सोकाटे ८७.१८ टक्के गुण घेऊन उत्तीर्ण झाले आहेत.

या सर्व यश संपादन केलेल्या विद्यार्थ्यांचे संस्थेचे अध्यक्ष शिवचरण धाराशिवे, उपाध्यक्ष प्रभाकर कापसे, सचिव बसवराज धाराशिवे, सहसचिव महादेव खिचडे, विश्वेश्वरय्या इंन्स्टिटयुट ऑफ इंजिनीअरिंग अॅण्ड टेक्नॉलॉजी महाविद्यालयाचे प्राचार्य प्रशांत धाराशिवे, उपप्राचार्य गोपाळ दंडिमे, विभाग प्रमुख रेवणसिध्द बुक्का, प्रविण साबदे, अंकुश बिडवे, मंगेश बिडवे, संदेश माडे, अजित लोकरे, अब्दुल समद काझी, सर्व प्राध्यापकवृंद व शिक्षकेत्तर कर्मचारी यांनी अभिनंदन केले.

## केशवराजच्या समीक्षा देवणेची राष्ट्रीय शालेय सायकलिंग स्पर्धेसाठी निवड



**लातूर/प्रतिनिधी :** राज्यस्तरीय शालेय रोड सायकलिंग स्पर्धा २०२५ - २६ अहिल्यानगर येथे पार पडल्या. त्यात लातूर विभागातून २४ खेळाडूंनी सहभाग नोंदवला होता. या सर्व खेळाडूंमध्ये श्री केशवराज माध्यमिक विद्यालयाची इयत्ता नववी मध्ये शिकत असलेली विद्यार्थिनी कु.समीक्षा मनोजकुमार देवणे हिने उत्कृष्ट कामगिरी केली. १४ वर्ष मुलींच्या गटात द्वितीय क्रमांक प्राप्त करून तिची निवड झारखंड येथे होणाऱ्या राष्ट्रीय शालेय सायकलिंग स्पर्धेसाठी झालेली आहे.

या यशस्वी विद्यार्थिनीचे व तिला मार्गदर्शन करणारे शिक्षक प्रयागराज गरुड, गुरुनाथ झुंजारे व मंजुषा बरसाले यांचे भारतीय शिक्षण प्रसारक संस्थेचे अध्यक्ष डॉ. सुरेंद्रजी आलूरकर, कार्यवाह डॉ. हेमंत वैद्य, मुख्य प्रशासकीय समन्वयक प्रा. चंद्रकांत मुळे, केंद्रीय कार्यकारिणी सदस्य प्रवीण सरदेशमुख, जितेश चापसी, संजय गुरव, स्थानिक समन्वय समितीचे अध्यक्ष धनंजय तुंगीकर, कार्यवाह शैलेश कुलकर्णी, माध्यमिक शालेय समितीचे अध्यक्ष गंगाधर खेडकर, विद्यालयाचे मुख्याध्यापक बालासाहेब केंद्रे, केंद्रीय विद्यासभा संयोजक तथा उपमुख्याध्यापक महेश कस्तुरे, पर्यवेक्षक राजश्री कुलकर्णी, इंदू ठाकूर, अंजली निर्मळे, राम जोशी, धनंजय कुलकर्णी तसेच विद्यालयातील सर्व शिक्षक, शिक्षकेर कर्मचारी यांनी अभिनंदन करून पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.

## मुक्तांगणच्या चिमुकल्यांनी साजरी केली क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले जयंती



**लातूर/प्रतिनिधी :** येथील विशाल नगर परिसरातील मुक्तांगण इंग्लिश स्कुल मध्ये सावित्रीबाई फुले जयंती मोठया उत्साहात साजरी करण्यात आली.

सर्व प्रथम क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेचे पूजन प्राचार्या सुमेरा शेख यांच्या हस्ते करण्यात आले.

या प्रसंगी शाळेच्या शिक्षिका प्रणिता सुरवसे यांनी सावित्रीबाई फुले यांच्या स्त्री शिक्षणासाठी केलेल्या कार्याची माहिती दिली. या निमित्ताने शाळेच्या आद्या प्रमोद हंगरगे, मेधावनी मिलिंद दवणे, गौरवी महेशकुमार मुंदडा, आराध्या गोपाल खटावकर, आनंदी सुरज काळे, मृदुला संदीप मोहिते, श्रीशा नितीन ठाकूर या विद्यार्थिनी सावित्रीबाई फुले यांची वेशभूषा साकारून आपले मनोगत व्यक्त केले.

या प्रसंगी शाळेच्या विद्यार्थ्यांनी सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेस अभिवादन केले. या कार्यक्रमाचे सूत्र संचालन शाळेच्या शिक्षिका सुवर्णा माळवदकर यांनी केले.

या कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी शाळेच्या शिक्षिका व शिक्षकेत्तर कर्मचारी यांनी परिश्रम घेतले.

## दयानंद विज्ञानच्या रेणुका वाघ या माजी विद्यार्थीनीची आयआयटी, मुंबई येथे पीएच.डी.संशोधनासाठी निवड

**लातूर/प्रतिनिधी :** येथील दयानंद विज्ञान कनिष्ठ महाविद्यालयाच्या रेणुका सुभाष वाघ या माजी विद्यार्थीनीची



इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी (आयआयटी), मुंबई येथे संस्थेच्या स्थापत्य अभियांत्रिकी विभाग/केंद्र/शाळेतील पीएच.डी. कार्यक्रमासाठी नुकतीच निवड झालेली आहे.

त्याबद्दल महाविद्यालयाचे प्र.प्राचार्य डॉ.सिद्धेश्वर बेललाळे,उपप्राचार्य प्रा.भाऊसाहेब सरवदे,पर्यवेक्षिका डॉ. संध्या कोल्हे,पर्यवेक्षक हेमंत वरुडकर, कार्यालयीन अधीक्षक नवनाथ भालेराव यांच्यासह सर्व विभाग प्रमुख,प्राध्यापक,शिक्षक आणि शिक्षकेत्तर कर्मचारी यांनी तिचे अभिनंदन व कौतुक केले आहे.

## दयानंद इन्स्टिट्यूट ऑफ फार्मसीमध्ये क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले जयंती उत्साहात साजरी

**लातूर/प्रतिनिधी :** स्त्री शिक्षणाची जननी आणि भारतातील पहिल्या महिला शिक्षिका क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांची जयंती दयानंद इन्स्टिट्यूट ऑफ फार्मसी, लातूर येथे मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली. कार्यक्रमाची सुरुवात सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून करण्यात आली. या कार्यक्रमाला संस्थेचे सचिव मा. रमेशजी बियाणी, संस्थेचे सदस्य मा. सागर मंत्री, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. वाजिद चाऊस, तसेच आर्किटेक्चर महाविद्यालयाच्या प्राचार्या प्रा. प्रीती पटवारी हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते.या प्रसंगी बोलताना संस्थेचे सचिव मा. रमेशजी बियाणी म्हणाले, ''सावित्रीबाई फ ुले यांनी प्रतिकूल परिस्थितीत महिलांसाठी शिक्षणाची दारे खुली केली. आज प्रत्येक क्षेत्रात महिला ज्या शिखरावर पोहोचल्या आहेत, त्याचे श्रेय सावित्रीबाईंना जाते.''कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रा. प्रसाद कावळे यांनी केले, तर आभार प्रदर्शन महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. वाजिद चाऊस यांनी मानले. या वेळी विभाग प्रमुख प्रा. अरुण कोंडापुरे तसेच इतर शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## डॉ. बाबासाहेब आंबेडकर संघाच्या शाखास्थानी आल्याच्या स्मरणार्थ बंधुता परिषद संपन्न



**लातूर/प्रतिनिधी :** भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे दि.२ जाने. १९४० रोजी कराड जि. सातारा येथील राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या शाखास्थानी आले होते. त्या घटनेच्या स्मरणार्थ लातूर शहरात लोकसेवा मंडळातर्फे भालचंद्र ब्लड बँक याठिकाणी बंधुता परिषद घेण्यात आली.

या परिषदेत प्रमुख वक्ते प्रा. बालाजी कळंबे तसेच विभागीय पोलीस तक्रार प्राधिकरणाचे सदस्य मिलींद बिलोलीकर यांची उपस्थिती होती. तर प्रमुख पाहुणे म्हणून जगदीश तोष्णीवाल, संजय कांबळे उपस्थित होते. यावेळी बोलताना प्रा. कळंबे यांनी प्रथमतः राष्ट्र... म्हणणाऱ्या डॉ. आंबेडकरांनी संपूर्ण आयुष्य या देशाच्या कल्याणासाठी, गोर - गरीबांच्या उद्धारासाठी वाहिले. प्रत्येक जागरूक व्यक्तीने त्याचा विसर पडू न देता पुढील पिढीला जागृत करावे असे विचार व्यक्त केले. त्याची प्रसिद्धी डॉ. आंबेडकरांच्या तत्कालीन साप्ताहिक जनता व दै. केसरी मध्ये करण्यात आली होती. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या महनीय कार्यावरही त्यांनी प्रकाश टाकला. मिलिंद बिलोलीकर यांनी आपल्या मार्गदर्शनात डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी मतभेद असून सुद्धा मी संघाकडे आपलेपणाने पाहतो. काही जरूर लागेल त्याप्रसंगी मदत करण्याचे आश्वासन दिल्याची आठवण करून दिली. डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे इतरांच्या विचारांचा सन्मान करत, संवाद करत. डॉ. हेडगेवार यांनी सुद्धा एकता आणि बंधुता हेच ध्येय ठेऊन संघाची स्थापना केली होती आणि १०० वर्षांपासून संघाचे स्वयंसेवक तेच ध्येय डोळ्यासमोर ठेवून राष्ट्रीय एकात्मतेसाठी अविरत कार्य करत आहेत. असे महापुरुष आम्हाला लाभले हे आपले सर्वांचे भाग्य आहे,असे असा विचारही मिलिंद बिलोलीकर यांनी व्यक्त केले.

या कार्यक्रमात राज्य शासनाचे पुरस्कार प्राप्त कार्यकर्ते वाघमारे, चव्हाण, कांबळे, विराळे यांचाही सत्कार करण्यात आला. तसेच संघाचे स्वंयसेवक, महीला व विद्यार्थी, मोठ्या संख्येने उपस्थितीत राहीले. सौ संगीता ताई शिंदे यांनी सूत्रसंचालन केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक शिवाजी चौरे यांनी केले. डॉ. संतोष जमदाडे यांनी सर्व उपस्थितांचे आभार मानले.

## ईएचव्ही ट्रान्सफॉर्मर विषयावर महापारेषणतर्फे प्रगत प्रशिक्षण

### प्रशिक्षणात अपर जिल्हाधिकारी श्रीमती सुचिता भिकाने यांचे मार्गदर्शन





**मुंबई /प्रतिनिधी:** महाराष्ट्र राज्य विद्युत पारेषण कंपनीने (महापारेषण) कर्मचाऱ्यांची तांत्रिक क्षमता अधिक सक्षम करण्याच्या उद्देशाने सिमेन्स एनर्जी इंडिया लिमिटेडच्या सहकार्याने ईएचव्ही बुशिंगसह ट्रान्सफॉर्मर चाचणी व संचलन व सुव्यवस्थामधील सर्वोत्तम ट्रबलशूटिंग पध्दती या विषयावर कळवा येथे २९ डिसेंबर २०२५ ते २ जानेवारी २०२६ या कालावधीत पाच दिवसीय प्रगत प्रशिक्षण कार्यक्रम घेण्यात आला.

या प्रशिक्षणात अतिउच्च दाब (ईएचव्ही) ट्रान्सफॉर्मरची रचना, उत्पादन प्रक्रिया, विविध चाचण्या, देखभाल तसेच बिघाड निवारण याबाबत सखोल व प्रत्यक्ष उपयुक्त माहिती देण्यात आली. तसेच सिमेन्स एनर्जीच्या ट्रान्सफॉर्मर कारखान्याला भेट देऊन सहभागी अभियंत्यांना प्रत्यक्ष उत्पादन प्रक्रियेचा अनुभव घेण्याची संधी मिळाली.

प्रशिक्षणाच्या समारोपप्रसंगी अपर जिल्हाधिकारी तथा कार्यकारी संचालक (मानव संसाधन) श्रीमती सुचिता भिकाने यांनी मार्गदर्शन करताना कर्मचाऱ्यांचे मानसिक व शारीरिक आरोग्य संस्थेच्या प्रगतीसाठी महत्त्वाचे असल्याचे नमूद केले. समारोप सत्रात समूपदेशक श्री. समीर जंगम यांनी आत्मसन्मान व यशातील अडथळे या विषयावर तर डॉ. सायली यादव यांनी तणाव व्यवस्थापनाबाबत उपस्थितांना मार्गदर्शन केले.

कार्यक्रमाच्या शेवटी सहभागी कर्मचाऱ्यांकडून अभिप्राय घेण्यात आला. प्राप्त सूचनांवर योग्य ती कार्यवाही करण्यात येईल, असे आश्वासन कार्यकारी संचालक (मानव संसाधन) श्रीमती सुचिता भिकाने यांनी दिले. या प्रशिक्षणामुळे महापारेषणच्या अभियंत्यांचे तांत्रिक कौशल्य अधिक बळकट होऊन राज्यातील वीज पारेषण व्यवस्था अधिक विश्वासार्ह बनेल, असा विश्वास व्यक्त करण्यात आला.

## लॉर्ड श्रीकृष्ण इंग्लिश स्कुल मध्ये क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले जयंती साजरी



**लातूर/प्रतिनिधी :** परिसरातील मातोश्री कलावती प्रतिष्ठान संचालित लॉर्ड श्रीकृष्ण इंग्लिश स्कुल मध्ये सावित्रीबाई फुले जयंती मोठया उत्साहात साजरी करण्यात आली.

सर्व प्रथम क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेचे पूजन प्राचार्या रुपाली कुलकर्णी, शाळेचे समन्वयक रौफ शेख, शाळेच्या समन्वयिका रुपाली कोकाटे, नम्रता झांबरे, प्रियांका नागलबोने, विद्या पाटील यांच्या हस्ते झाले.

शाळेच्या शिक्षिका अर्चना शिंदे यांनी सावित्रीबाई फुले यांच्या स्त्री शिक्षणासाठी केलेल्या कार्याची माहिती विद्यार्थ्यांना दिली. स्त्री शिक्षणाचा पाया घालणाऱ्या सावित्रीबाईंना खूप मोठा संघर्ष करावा लागला मात्र त्यांनी स्वीकारलेले स्त्री शिक्षणाचे कार्य अर्धवट सोडले नाही. पहिल्या महिला शिक्षिका म्हणून त्यांना गौरविले जाते. त्यांच्या संघर्षामुळे स्त्रियांना शिक्षणाची व प्रगतीची दारे खुली झाली.

या निमित्ताने शाळेच्या कृतिका अवशंक, वेदांती दळवी, मायरा सातपुते, कृतिका बरुरे, श्रावणी कानडे, माही माळी, श्रद्धा कापसे, श्रेया दरेकर, हर्षदा जवादे, सुकन्या वाघमारे, ख़ुशी बनसोडे या विद्यार्थिनीनी सावित्रीबाई फुले यांची वेशभूषा साकारून आपले मनोगत व्यक्त केले.

या प्रसंगी शाळेच्या सर्व विद्यार्थ्यानी सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेस आभिवादन केले. या कार्यक्रमाचे सूत्र संचलन शाळेच्या समन्वयिका रुपाली कोकाटे, यांनी केले, यावेळी शाळेचे शिक्षक, शिक्षिका व शिक्षकेत्तर कर्मचारी उपस्थित होते.

प्रो. जडे यांचे रबरी शिक्के
कॉम्प्युटर नॉयलॉन रबर असलेले
टिकाऊ रबरी शिक्के
तयार करून मिळतील.



शाखा १.
जडे-भारत प्रिंटींग प्रेस, मेनरोड, लातूर
शाखा २.
जडे ऑफसेट प्रिंटर्स, मित्र नगर, लातूर
संपर्क: (०२३८२) २४२६०८,२४५४०९

# केंद्रात, राज्यात भाजपाची सत्ता, भाजपाचे आमदार असल्याने विकासासाठी जिप, पंस सदस्य भाजपाचेच असले पाहिजेत

## बामणी येथे ५० लक्ष रूपये खर्चाच्या विकास कामाचा युवा नेते ऋषिकेश कराड यांच्या हस्ते शुभारंभ

**लातूर/प्रतिनिधी :** केंद्रात नरेंद्रजी मोदी साहेब यांच्या नेतृत्वातील आणि राज्यात देवेंद्रजी फडणवीस साहेब यांच्या नेतृत्वातील भाजपाचे सरकार आहे. लातूर ग्रामीण मतदार संघातून रमेशआप्पांच्या माध्यमातून भाजपाचाच आमदार असून बामणी आणि परिसरातील सर्वांगीण विकासासाठी येणाऱ्या काळातील निवडणुकीत जिल्हा परिषद आणि पंचायत समितीचा सदस्य भाजपाचा निवडून येणे गरजेचे आहे असे प्रतिपादन भाजयुमोचे जिल्हाध्यक्ष ऋषिकेशदादा रमेशआप्पा कराड यांनी केले.



लातूर तालुक्यातील मौजे बामणी येथे दलित वस्ती सुधार योजनेतून १३ लक्ष रुपये खर्चाच्या बौद्ध विहारचे, २५ लक्ष रुपये खर्चाच्या लोकशाहीर अण्णाभाऊ साठे समाज मंदिराचे लोकार्पण आणि १२ लक्ष रुपये खर्चाच्या सिमेंट रस्ता आणि नाली बांधकामाचे भूमिपूजन तसेच भारतीय जनता युवा मोर्चाच्या जिल्हाध्यक्षपदी निवड झाल्याबद्दल युवा नेते ऋषिकेशदादा कराड यांच्या हस्ते रविवारी सकाळी मोठ्या उत्साहाच्या वातावरणात करण्यात आले. यावेळी भाजपाचे जिल्हा उपाध्यक्ष नवनाथ भोसले, संगायो समिती अध्यक्ष बन्सी भिसे, भाजपाचे मंडलाध्यक्ष प्रताप पाटील, महादेव साळुंके, पांडुरंग बालवाड, हनुमंत गव्हाणे, अमर चव्हाण, प्रशांत शिंदे, संजय पाटील, सुधाकर शिंदे, सचिन पासमे, आत्माराम जाधव, रुपेश काळे, अहमद शेख, सरपंच भागवत दिवटे, विजय पाटील, राम बंडापल्ले यांची प्रमुख उपस्थिती होती.

भाजपाचे युवा नेते ऋषिकेशदादा कराड यांचे बामणी गावात आगमन होताच मोठ्या उत्साहाच्या आणि जल्लोषाच्या वातावरणात फटाक्याची आतिषबाजी करत विविध वाजंत्रीसह जेसीबीतून फुले उधळून स्वागत करण्यात आले लोकार्पण आणि भूमिपूजनानंतर आयोजित जाहीर कार्यक्रमात बोलताना युवा नेते ऋषिकेशदादा कराड म्हणाले की, विधानसभा निवडणुकीत रमेशआप्पा कराड साहेबांवर बामणी आणि परिसरातील मतदारांनी मोठे प्रेम दिले, विश्वास दिला. मतदान कर्ज रुपी आशीर्वाद दिले येत्या पाच वर्षात घेतलेले कर्ज विकास कामाच्या माध्यमातून व्याजासकट परत करणार आहोत. सत्ता नसताना कामे केली जनतेच्या न्याय हक्कासाठी संघर्ष केला आता तर सत्ता आहे त्यामुळे गावच्या विकासाचे कोणतेही काम शिल्लक राहणार नाही असे त्यांनी बोलून दाखवले.

महादेव मंदिराच्या सभागृह बांधकामासाठी लवकरच निधी उपलब्ध करून दिला जाईल अशी ग्वाही देऊन येणाऱ्या काळात भारतीय जनता पार्टीच्या पाठीशी आपले आशीर्वाद द्यावेत आणि या भागाच्या विकासाला गती द्यावी असेही आव्हान ऋषिकेशदादा कराड यांनी केले. लातूर ग्रामीणचे आमदार श्री रमेशआप्पा कराड यांच्या माध्यमातून संपूर्ण मतदारसंघात झालेल्या विविध विकास कामाची माहिती भाजपाचे नवनाथ भोसले यांनी दिली तर कार्यक्रमाचे प्रास्ताविक संजय पाटील यांनी केले शेवटी दिलीप कांबळे यांनी उपस्थित यांचे आभार मानले.

या कार्यक्रमास सूर्यकांत धारासुरे, अंबादास दिवटे, प्रदीप चित्ते, संजय सावंत, रंगनाथ दिवटे, संजू बंडापल्ले, श्रीपाल गवारे, तुकाराम चिते, गोविंद वाघमारे, बालाजी बंडापल्ले, सोहेल मुजावर, आनंद वाघमारे, तात्याराव कांबळे, विनोद वाघमारे, माणिक इंगळे, संदीप लांडगे, लखन लांडगे यांच्यासह भाजपाचे कार्यकर्ते, पदाधिकारी, ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# प्रशासकीय अनुभव आणि समाज सेवेचा संगम : अध्यक्ष वसंत पोतदार यांचा गौरवशाली प्रवास

सोनार समाजातील जेष्ठ व्यक्तिमत्व आणि सोनार समाज संस्थेचे अध्यक्ष श्री वसंत पोतदार यांना त्यांच्या प्रशासकीय आणि सामाजिक क्षेत्रातील प्रदीर्घ सेवेबद्दल पब्लिक प्रिंट वर्ल्ड या नामांकित संस्थेच्या वतीने सन २०२५ चा राज्यस्तरीय जीवन गौरव पुरस्कार दि. २६ डिसेंबर रोजी प्रदान करण्यात आला. या पुरस्कारामुळे सोनार समाजाच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला गेला असून सर्वत्र अभिनंदन होत आहे. श्री. वसंत पोतदार यांनी गेल्या तीन दशकापासून सामाजिक कार्य करीत आहेत. समाजाच्या प्रगतीसाठी त्यांचे कार्य मोलाचे आहे. स्वातंत्र्य सैनिकाचा वारसदार म्हणून त्यांना लाभलेला वारसा आणि सोनार समाजाच्या प्रश्नांची जाण ठेऊन त्यांनी केलेले कार्य, त्यांचे नेतृत्व आदर्शवत आहे. त्यांच्या या निस्वार्थी सेवेची दखल घेऊन पब्लिक प्रिंट वर्ल्ड या संस्थेने त्यांना जीवन गौरव या सर्वोच्च पुरस्काराने सन्मानीत केले. दि. २८ डिसेंबर रोजी सोलापुरात सोनार समाजाचा भव्य गौरव सोहळा व माहिती शिबीर संपन्न झाला. या मोठया कार्यक्रमापूर्वीच समाजाच्या अध्यक्षाना राज्यस्तरीय पुरस्काराने सन्मानीत करून गौरव केल्याबद्दल संस्थेच्या पदाधिकाऱ्यात व समाज बांधवामध्ये आनंदाचे आणि उत्साहाचे वातावरण निर्माण झाले होते. वसंत पोतदार यांनी गेली अनेक वर्षे पदाची अपेक्षा न करता केवळ समाज हित जोपासले. शब्दाला किंमत आणि कार्याला गती हेत्यांचे ब्रीद वाक्य या पुरस्काराच्या रुपाने पुनः एकदा अधोरेखित झाले आहे. त्यांचा निःस्पृह नेतृत्वामुळेच आज समाज संघटीत होत आहे. शिस्त आणि अचूकता यांचा संगम त्यांच्या व्यक्तिमत्वात पहायला मिळतो. सोनार, सुवर्णकार समाज बांधवासाठी ते एक मार्गदर्शक दिपस्तंभच आहेत. व्यावसायिक सचोटी कशी जपावी आणि सामाजिक ऋणातून कसे मुक्त व्हावे याचा वस्तुपाठच त्यांनी घालून दिला आहे. त्यांना समाजात असलेली प्रतिष्ठा आणि त्यांच्या बद्दल वाटणारा आदर हा कोणत्याही पुरस्कारापेक्षा मोठा आहे. राज्यस्तरीय जीवन गौरव पुरस्कार खऱ्या अर्थाने योग्य हातामध्ये पोहचला आहे. अशा भावना समाज बांधवानी व्यक्त केल्या आहेत. वसंत पोतदार यांची समाज सेवा ही कोणत्याही तरुणाला प्रेरणा देणारी आहे. विशेष म्हणजे दोन्ही गुडघ्याची शस्त्रक्रिया झालेली असतानाही केवळ प्रबळ इच्छा शक्तीच्या जोरावर त्यांनी स्वतःच्या शारीरिक व्याधीकडे दुर्लक्ष करून समाजाचा दि. २८ डिसेंबर चा महाकुंभ यशस्वी करण्यासाठी अहोरात्र कष्ट उपसले.गुडघे प्रत्या रोपणाच्या शस्त्र क्रियेनंतर चालण्या फिरण्यावर बंधने येतात मात्र वसंत पोतदार यांनी विश्रांतीपेक्षा समाजाची प्रगती महत्वाची मानली . २८ डिसेंबर चा सन्मान सोहळा आणि शासकीय योजना माहिती शिबीर यशस्वी करण्यासाठी अनेक समाज बांधवाना संपर्क साधला. चालताना आणि तीन तीन मजले पायऱ्या चढताना होणारा त्रास किंवा वयोमानामुळे होणारा थकवा यावर केवळ समाज सेवेच्या ध्यासाने त्यांनी मात केली.मला व दत्तगुरु वेदपाठक आम्हां दोघांना त्यांच्यातील दुर्दम्य इच्छाशक्तीचे दर्शन झाले.. शिस्त आणि अचूकता आणि पारदर्शकता जपणाऱ्या वसंत पोतदार यांनी आपल्या कृतीतून सिद्ध केले की, ध्येय समोर असेल तर, शरीर साथ देतेच ! पण मन खंबीर असावे लागते. शरीर थकले असले तरी समाजासाठी कांही तरी करण्याची जिद्द आजही तेवढीच तरुण आहे. एकीकडे महसूल खात्यातील नायब तहसीलदार म्हणून गौरवशाली कारकीर्द आणि दुसरीकडे गुडघ्याच्या शस्त्र क्रियेनंतर ही समाज कार्यासाठी घेतलेले ध्यास! वसंत पोतदार यांच्यातील एका सच्चा समाज सेवकाचे दर्शन घडविते. त्यांना उत्तम आरोग्य आणि उदंड आयुष्य लाभो अशी ईश्वराकडे प्रार्थना करून पुढील सामाजिक कार्यासाठी शुभेच्छा !



-----------------

जीवन गौरव पुरस्कार --हा सन्मान समाजातील प्रत्येक बांधवांचा आहे. मला मिळालेला हा पुरस्कार म्हणजे माझ्या आयुष्यातील समाजसेवेच्या प्रवासाला मिळालेली पावती आहे. समाज ऋणातून मुक्त होण्यासाठी माझे प्रयत्न शेवट पर्यंत सुरूच राहतील.

- **वसंत पोतदार** अध्यक्ष, सोनार समाज संस्था सोलापूर

--**विजयकुमार पोतदार** –
उपाध्यक्ष, सोनार समाज संस्था, सोलापूर
मोबाईल. ९०४९९ ९६९४६

# लातूर जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणूक: काँग्रेस ॲक्शन मोडवर!

## ५ ते ९ जानेवारी दरम्यान उमेदवारी अर्ज स्वीकारले जाणार

**लातूर/प्रतिनिधी :** स्थानीक स्वराज्य संस्था जिल्हा परीषद पंचायत समिती निवडणूक लवकरच सुरू होत आहे. लातूर जिल्हयातील या आगामी निवडणुकांची जोरदार तयारी सुरू करण्यासाठी लातूर जिल्हा काँग्रेस कमिटीने युध्दपातळीवर तयारी सुरू केली आहे. जिल्हाध्यक्ष अभय साळुंके यांनी पक्षाचे अधिकृत प्रसिद्धीपत्रक जारी करत इच्छुक उमेदवारांच्या अर्ज स्वीकारण्याची प्रक्रिया आणि उमेदवारी अंतिम करण्याच्या तारखांचा संपूर्ण रोडमॅप जाहीर केला आहे. यानुसार सोमवार दि. ५ जानेवारी २६ पासून काँग्रेस भवन, लातूर येथे अर्ज स्विकारण्यास सुरुवात करण्यात आली आहे.

या स्थानीक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका जिंकण्यासाठी पक्षाने संपूर्ण वेळापत्रक अत्यंत शिस्तबद्ध पद्धतीने आखले असून, संपूर्ण प्रक्रिया लातूरमधील काँग्रेस भवन येथूनच पार पडणार आहे.

लातूर जिल्हयातील स्थानीक स्वराज्यसंस्थाच्या निवडणुकीसाठी इच्छुक असलेल्या उमेदवारांना आपले अर्ज भरून सोमवार दि. ५ जानेवारी पासून सायंकाळी ५ : ०० वाजेपर्यंत सादर करता येणार आहेत. हे अर्ज काँग्रेस भवन, लातूर येथे शुक्रवार ९ जानेवारी पर्यंत स्वीकारले जाणार आहेत. या निवड प्रक्रीयेतील अर्ज काँगेस भवन येथे आशिष पाटील - जळकोट, बाबासाहेब गायकवाड ओसा, चंद्रशेखर दंडीमे लातूर, सहदेव मस्के - लातूर, दगडूसाहेब पडीले-लातूर, प्रभाकर बंडगर (शिरूर अनंतपाळ-निलंगा, प्रा. डॉ. बालाजी वाघमारे (लातूर), निळकंठ भोसले, धनराज टेकाळे, बाळकृष्ण माने (रेणापूर) यांच्याकडे अर्ज स्वीकारण्याची जबाबदारी सोपवण्यात आली आहे. काँग्रेस पक्षाकडील उमेदवारीसाठीचे इच्छुकांचे अर्ज स्वीकारण्याची प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर, दुसऱ्याच दिवशी म्हणजेच १० नोव्हेंबर २०२५ रोजी जिल्हा निवड समितीची बैठक होणार आहे. या बैठकीमध्ये दाखल झालेल्या सर्व अर्जांची छाननी करून, उमेदवारांच्या नावांची शिफारस तातडीने प्रदेश काँग्रेस कमिटीकडे पाठवण्यात येणार आहे. जिल्हा समितीने शिफारस केलेल्या नावांवर प्रदेश निवड समिती निर्णय घेणार आहे. प्रदेश निवड समिती या नावांवर अंतिम शिक्कामोर्तब करून उमेदवारांची यादी जाहीर करण्याची शक्यता आहे.

जिल्हाध्यक्ष अभय साळुंके यांनी सर्व इच्छुकांनी वेळेचे बंधन पाळून आणि पक्षाच्या शिस्तीनुसार अर्ज दाखल करावेत, असे आवाहन प्रसिद्धीपत्रकाद्वारे केले आहे. अभय साळुंके यांच्या या स्पष्ट वेळापत्रकामुळे लातूर काँग्रेसने निवडणुकीसाठी कंबर कसल्याचे चित्र स्पष्ट झाले आहे.

# दयानंद कला महाविद्यालयात महिला व सायबर सुरक्षेवर विशेष व्याख्यान संपन्न



**लातूर/प्रतिनिधी :** स्त्री शिक्षणाच्या जननी क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या जयंतीचे औचित्य साधून येथील दयानंद कला महाविद्यालयात महिला सुरक्षा व सायबर सुरक्षा या विषयावर विशेष व्याख्यान आयोजित करण्यात आले होते. या प्रसंगी पोलीस निरीक्षक इंद्रजीत वर्धन व गणपत जाधव यांनी विद्यार्थ्यांना कायदेशीर संरक्षण आणि डिजिटल साक्षरतेबाबत मोलाचे मार्गदर्शन केले.

कार्यक्रमाच्या प्रारंभी मान्यवरांच्या हस्ते सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. यावेळी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. शिवाजी गायकवाड, उपप्राचार्य डॉ. अंजली जोशी, उपप्राचार्य डॉ. दिलीप नागरगोजे आणि डॉ. प्रशांत दीक्षित यांची प्रमुख उपस्थिती होती.

महिला सुरक्षेवर मार्गदर्शन करताना पोलीस निरीक्षक इंद्रजीत वर्धन म्हणाले की, मुलींनी आपल्या सुरक्षिततेबाबत अत्यंत सजग असणे काळाची गरज आहे. स्वतःबाबत कोणताही अनुचित प्रकार घडल्यास मनात भीती न बाळगता त्वरित पोलीस प्रशासनाशी संपर्क साधून तक्रार नोंदवावी. कायद्यानुसार १८ वर्षांखालील सर्व मुले समान पातळीवर असतात, त्यामुळे लिंगभेदापलीकडे जाऊन कायद्याचे स्वरूप समजून घेणे आवश्यक आहे. विद्यार्थ्यांनी गुन्हेगारी प्रवृत्तीकडे न वळता आपले संपूर्ण लक्ष उज्ज्वल करिअर घडवण्यावर केंद्रित करावे, असा सल्लाही त्यांनी यावेळी दिला.

सायबर सुरक्षेबाबत बोलताना श्री. गणपत जाधव यांनी सोशल मीडियाच्या धोक्यांविषयी विद्यार्थ्यांना सतर्क केले. आपला वैयक्तिक डेटा मोबाईलमध्ये सुरक्षित नसतो, हे सांगताना त्यांनी स्पष्ट केले की, अनोळखी व्यक्तींशी चॅटिंग करणे किंवा संशयास्पद संदेशांना प्रतिसाद देणे टाळावे. जर मोबाईलवर चुकीचे मेसेज किंवा फोन येत असतील, तर त्याबाबत लपवाछपवी न करता तात्काळ पालक, शिक्षक किंवा पोलिसांची मदत घ्यावी, असे आवाहन त्यांनी केले.

अध्यक्षीय भाषणात उपप्राचार्य डॉ. दिलीप नागरगोजे यांनी बदलत्या काळात मुला-मुलींनी सजग राहून सोशल मीडियाचा वापर कौशल्याने करावा, असे सांगितले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. सुरेश क्षीरसागर यांनी केले, तर आभार प्रा. दशरथ ननवरे यांनी मानले. या कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी डॉ. सुधीर गाडवे, प्रा. महेश जंगापल्ले

## CHANGE IN NAME

I HAVE CHANGE MY NAME FROM WAHEDABI NABILAL MASULDAR TO VAHEDABI NABISAB MASULDAR HENCE FROTH THIS DECLERATION AND WILL BE KNOWN BY THIS NAME I WILL USE. VAHEDABI NABISAB MASULDAR IN FUTURE THE SAME NAME WILL BE USED BY MY CHILDREN AND FAMILY.
OLDNAME:WAHEDABINABILALMASULDAR
NEWNAME:VAHEDABINABISABMASULDAR
ADDRESS:W/ONABISABMASULDAR,SHIVAJI NAGAR,NILANGA,LATUR,MAHARASHTRA-413521

## बहिर्द्वार ..

तपासचाले अहोरात्र
यंत्रणेचे माने आभार
आधी अनेक केसेस
त्यात वाढला प्रभार

गजाड करणार दोषी
करतात कसे संप्रधार
उत्तर नसे या प्रश्नाला
बुरख्यात का सूत्रधार

पत्रकारपरिषद गाजे
वक्तव्यकरत भरधार
नाटकतमाशा रंगला
वठे भूमिका किरदार

पोलिस यंत्रणा फिरे
खात्यात जमा पगार
नादुरुस्त वाहने गर्दी
भरगच्चभरलेआगार

अफवा वर्षा सातत्ये
बरसूलागे मुसळधार
नवनवीन आरोपसत्र
भले असोत निराधार

निसटून जावो कुणा
उघडून ठेवा बहिर्द्वार
रहस्य ठेवावी शाबूत
बंदिस्त करा अंतर्द्वार

**हेमंत मुसरीफ पुणे.**
९७३०३०६९९६.

लातूर महानगरपालिका निवडणूक २०२५-२६: 'स्वीप' कक्षाअंतर्गत महिला बचत गटांचा भव्य मेळावा संपन्न

# मतदान हा लोकशाहीचा पाया; महिलांनी मतदानाचा टक्का वाढवण्यासाठी पुढाकार घ्यावा !


**लातूर/प्रतिनिधी :** आगामी लातूर शहर महानगरपालिका सार्वत्रिक निवडणूक २०२५-२६ च्या पार्श्र्वभूमीवर मतदारांमध्ये जागृती निर्माण करण्यासाठी निवडणूक विभागाच्या स्वीप (SVEEP) कक्षाच्या वतीने विविध उपक्रम राबवले जात आहेत. याच मोहिमेचा भाग म्हणून लातूर शहरातील महिला बचत गटांचा भव्य मेळावा उत्साहात पार पडला. महिलांच्या सक्रिय सहभागातून मतदानाची टक्केवारी वाढवणे हा या मेळाव्याचा मुख्य उद्देश होता.या कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे म्हणून जिल्हा शल्यचिकित्सक कार्यालयातील विधी समुपदेशक (PCPNDT) ॲड.अनिता पुंडलिकराव मेखले,मनपा उपायुक्त श्रीम.वसुधा फड आणि शहर अभियंता श्रीम.उषा शिंदे-काकडे यांची उपस्थिती होती.

यावेळी बोलताना मान्यवरांनी महिलांच्या सामाजिक आणि राजकीय सहभागावर भर दिला. कुटुंबाची धुरा सांभाळणाऱ्या महिलांनी मतदानाच्या दिवशी घराबाहेर पडून आपला हक्क बजावणे गरजेचे आहे, असे आवाहन यावेळी करण्यात आले.

कार्यक्रमाचे यशस्वी आयोजन लातूर महानगरपालिकेच्या शिक्षणाधिकारी तथा 'स्वीप' कक्षाच्या नोडल अधिकारी मा. श्रीम. श्र्वेता नागणे यांनी केले होते. त्यांच्या मार्गदर्शनाखाली उपस्थित महिलांना आगामी निवडणुकीत शंभर टक्के मतदान करण्याची 'मतदार शपथ' देण्यात आली. तसेच 'मी मतदान करणारच' अशा आशयाच्या संकल्प पत्रांचे वितरणही यावेळी करण्यात आले.

या मेळाव्यासाठी 'दीनदयाळ अंत्योदय योजना राष्ट्रीय नागरी उपजीविका अभियाना'तंर्गत (NULM) स्थापन झालेल्या बचत गटांच्या महिलांनी मोठी गर्दी केली होती. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी शहर अभियान व्यवस्थापक श्री. लक्ष्मण जाधव यांचे मोलाचे सहकार्य लाभले.

तसेच समूह संसाधन व्यक्ती (CRP) श्रीम. मुळे, श्रीम. भालेराव, श्रीम. भालेकर, श्रीम. सोनकांबळे, श्रीम. गोरे, श्रीम. सातपुते, श्रीम. पवार श्रीम. जाधव आणि शहर अभियान व्यवस्थापक श्री. लक्ष्मण जाधव यांनी विशेष परिश्रम घेतले.




या मेळाव्यामुळे लातूर शहरातील महिला बचत गटांमध्ये मतदानाबाबत मोठी जनजागृती झाली असून, आगामी निवडणुकीत महिलांचा सहभाग लक्षणीय ठरण्याची चिन्हे आहेत.

Declaration
Change of Name.

I have changed my name from **MOHAMMED SUFIAN SAYYED** to **MOHAMMED SUFIYAN SAYYED ALI SAYYED** Hence for this declaration. And in future I will use my new name **MOHAMMED SUFIYAN SAYYED ALI SAYYED** Also, in future the same name will be used by my family.

Old Name : **MOHAMMED SUFIAN SAYYED**

New Name : **MOHAMMED SUFIYAN SAYYED ALI SAYYED**

Address : D R T 09, NEAR BLIND SCHOOL, LABOUR COLONY, LATUR 413 512, MAHARASHTRA, INDIA.

निलंगा शहरातील एलआयसी विमा भरण्याचे केंद्र
सितारी विमा सेवा केंद्र
दु.नं.२३, इदगाह कॉम्प्लेक्स, जनता दवाखान्यासमोर शिवाजी चौक, निलंगा.
वेळ सकाळी ९ ते सायं. ९ पर्यंत
जमीरोद्दीन सितारी
चेअरमन क्लक मेंबर CLIA
एजंट भरती चालू आहे.
संपर्क → Off: (02384) 242224, 9422612239, 9422658396

Printed and Published by Dayanand Shankar Jade on behalf of Latur Samachar and Printed at Jade Offset Printers Mitra Nagar Latur and Published at Mitra Nagar Latur.
Editor: Dayanand Shankar Jade Mo. 9422472502, RNI 47034/64, POSTAL NO. L2/RNP/OMD 52/24-26
हे पत्रक मुद्रक,प्रकाशक व मालक दयानंद शंकर जडे, यांनी जडे ऑफसेट प्रिंटर्स, मित्रनगर, लातूर (महाराष्ट्र) येथे छापून येथेच प्रकाशित केले आहे. मुख्यसंपादकः दयानंद शंकर जडे मो. ९४२२४७२५०२ आरएनआय ४७०३४/६४, पोस्टल क्र. एल२/आरएनपी/ओएमडी-५२/२४-२६